आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...


# शेतकरी संघटक

६ जुलै २०१२ | वर्ष २९ | अंक ७

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०




# आमीरचे सेंद्रीय अर्धसत्य

धरणांचे मुबलक पाणी पंजाबमध्ये मिळू लागल्यानंतर पंजाब सुजलाम-सुफलाम झाला. सर्वाधिक गव्हाचे एकरी उत्पन्न घेणारे राज्य म्हणून पंजाबला भारताचे गव्हाचे कोठार म्हणून गौरविण्यात आले. या मागे रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा व नवीन बियाण्यांचा वापर याबरोबरच सिंचनाच्या सोयीही असणे आवश्यक आहे. पंजाबमध्ये नेमके हेच घडले. भाक्रा-नांगल धरणामुळे संपूर्ण पंजाब सिंचनाखाली आला; परंतु पाण्याचा वाजवीपेक्षा अधिक वापर व त्याचे दुष्परिणाम आता दिसू लागले आहेत. शेतांमध्ये सतत ओल राहिल्यामुळे आणि त्यावर पुन्हा पाणी देण्यात आल्यामुळे पंजाबातील जमिनी क्षारपड होऊ लागल्या आहेत. उत्पन्नात हळूहळू घट होत आहे. उत्पन्न वाढीसाठी पुन्हा अधिकाधिक रासायनिक खतांचा वापर असे दुष्टचक्र सुरू झाले आहे. याला कारण हरितक्रांती, रासायनिक खते आणि कीटकनाशके नसून पाण्याप्रमाणेच त्यांचा मुक्त वापर हे आहे.

- ज्ञानेश्वर शेलार

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २९ । अंक ७ । ६ जुलै २०१२

मूल्य : ₹ १०

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

अंक मांडणी
**श्रीकांत दत्तात्रय झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.




# अंतरंग


शरदऋतू
**निसर्गशेतीवरील किडी**
शरद जोशी ........ ३

आजकाल
**आमीरचे सेंद्रीय 'अर्धसत्य'**
ज्ञानेश्वर शेलार........ ८

जागरण
**'सत्यमेव जयते'च्या डोळ्यांतले मूसळ**
श्रीकृष्ण उमरीकर ........ ११

मिरचीचं खळं
**छे छे हा घातपात नव्हताच!**
बाबू सोंगाड्या........ ११

कॉमन नॉन सेन्स
**म्हातारी काँग्रेस, पोरकट भाजप आणि भाबडी जनता**
सुधाकर जाधव ........ १४

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १६

# निसर्गशेतीचे फसवे अध्यात्म

राजमान्य राजश्री, तमाम हिंदी चित्रपट प्रेक्षकांचे लाडके, आधुनिक भारतातील महान समाज सुधारक मा. आमीर खान यांनी आपल्या 'सत्यमेव जयते' या कार्यक्रमात अन्नधान्याबाबत बऱ्याच गोष्टी सत्य वाटाव्या अशा रेटून सांगितल्या. परिणामी, टीव्ही बघणे हीच सामाजिक जबाबदारी मानणारे तमाम आळशी, सुस्त टीव्ही प्रेक्षक यांनाही तेच खरे वाटू लागले आहे. आपल्याकडे प्रचलित असलेला दुसरा एक शब्द आहे निसर्ग शेती. म्हणजे नैसर्गिकरीत्या पिकलेले अन्न खायचे. याची भलामण करणाऱ्यांच्या हे लक्षातच येत नाही, शेती हीच मूळात निसर्गाच्या विरुद्ध मानवाने केलेली सगळ्यांत मोठी कृती होय. शेतीचा इतिहास किमान १०,००० वर्षांचा आहे. कितीतरी वर्षांच्या अनुभवानंतर शेती प्रक्रियेमध्ये आणि पिकांमध्ये बदल होत गेला. निसर्गात जे उपलब्ध आहे, त्याच्यावरच अवलंबून राहिलो असतो, तर आज जी प्रगती दिसते आहे ती दिसली नसती. शेतीचा शोध लागण्याआधी लाखो वर्षांपासून मानवाचं अस्तित्व या पृथ्वीतलावर होतं; पण त्याला प्रगती साधता आली नाही. एका आदीम अवस्थेमध्येच लाखो वर्षे माणूस राहिला. शेती करायला लागल्यापासून एक नवीन विकासाचा मार्ग माणसाला सापडला. त्या दिशेने केलेल्या प्रवासातून आजचं जग आपल्यासमोर दिसतं आहे. हे सगळं माहीत असताना परत एकदा निसर्गशेती खरी, नैसर्गिकरीत्या पिकवलेले पदार्थ चांगले, रसायनं म्हणजे एकदम वाईट हे अध्यात्मिक गारूड का पसरवलं जात आहे?

आमीर खानचा कार्यक्रम बघत असताना प्रेक्षकांना हेही कळत नाही ते खात असलेल्या आंब्याच्या फोडीही रासायनिकरीत्या पिकवलेल्या आहेत. आज माणूस वापरत असलेली अन्नधान्य ही रासायनिकदृष्ट्या पिकवलेली आहेत आणि तरीही बोलताना मात्र नैसर्गिकरीत्या पिकवलेल्यांचा बोलबाला पसरवला जातो. या ढोंगाचे कारण काय?

भारतीय इतिहासात अशा ढोंगाची परंपरा फार पूर्वीपासून चालत आली आहे. एकीकडे भौतिक जग हे नश्वर आहे असं म्हणायचं आणि दुसरीकडे धर्माच्या नावाखाली मोठमोठी देवळं उभारायची, त्या ठिकाणी संपत्ती गोळा करायची आणि त्या अधिकारावरून सर्वसामान्य जनतेचं शोषण करायचं. प्रत्येक वेळी भोगाला दुय्यम समजायचं, देहधर्मांना क्षुल्लक मानायचं, स्वाभाविक वासनांकडे दुर्लक्ष करायचं आणि दुसरीकडे सगळ्या भोगवादी वृत्तींना आपलंसं करायचं हे एक ढोंग आपल्याकडे दिसून येतं. त्याचाच हा आधुनिक अवतार. निसर्गतः पिकवलेल्या पिकाची फॅशन शहरी किंवा शेतीपासून तुटलेल्या समाजामध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येते. स्वतः कृत्रिम धागे वापरायचे, त्यांच्या किफायतशीर किमती, त्यांचा टिकाऊपणा याचा उपयोग करून घ्यायचा आणि बोलताना मात्र सुती कपड्यांचे महत्त्व सांगायचे. मुंबईचे एक प्रसिद्ध कवी आम्हाला तावातावाने दहा वर्षांपूर्वी एकदा बीटी कॉटनच्या वापरामुळे शेतकरी कसं देशाचं नुकसान करतो आहे, हे सांगत होते. त्याचे वेगवेगळे दाखले देत होते. आपल्याकडचे देशी बियाणे किती चांगले आहे आणि त्याचाच कापूस कसा चांगला असतो हेपण सांगत होते. तेव्हा त्यांना कसलाही प्रतिवाद न करता आम्ही शांतपणे इतकाच मुद्दा मांडला होता. 'बीटी कापूस हा निदान शेतकऱ्याच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्यामुळे त्यांना राष्ट्रविरोधी काम केलं असं मान्य करूयात; पण पेप्सी आणि कोकाकोला या तर काही जीवनावश्यक गोष्टी नाहीत. मुंबईतलं तर सोडाच, तुमच्या चेंबूरमधलंही सोडा, तुमच्या कॉलनीतलं - अपार्टमेंटमधलं सोडा, तुमच्या स्वतःच्या घरातला पेप्सी आणि कोकाकोला बंद करून दाखवा आणि मग माझ्याशी या विषयावर गप्पा करा. बाष्कळ गोष्टींवर चर्चा करायला आम्हाला वेळ नाही.' आधुनिकीकरणाचे सगळे फायदे उचललेला समाज अन्नधान्याच्या बाबतीत मात्र मागास विचार का करतो आहे? १९६० ला हरित क्रांती झाली नसती तर भूकेने लोक मेले असते हे सगळ्यांना माहीत आहे. रसायनांचा वापर ही गोष्ट आक्षेपार्ह नसून त्या संदर्भातलं तारतम्य काय आहे हे बघायला पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाने अन्नधान्य जास्त प्रमाणात पिकवल्या जाणे हे तर आवश्यक आहेच; पण त्याचे जे आणि जसे काही दुष्परिणाम होत असतील ते तपासून त्यावर बंदी घालणे किंवा अशा गोष्टींना प्रोत्साहन देणारे किंवा त्याचा वापर करणाऱ्यांना शासन करणे ही महत्त्वाची गोष्ट आहे, त्याबाबतीत काहीच घडत नाही. प्रत्यक्षात रसायनांचा वापर केलेलं खूप मोठ्या प्रमाणातलं अन्नधान्य, फळफळावळ आम्ही वापरतो, त्याचा दुष्परिणाम घडतो आहे, असं सरसकट चित्र गेल्या ५० वर्षांत कुठेही दिसलं नाही. काही ठिकाणी अतिरिक्त कीटकनाशके, रसायनांचा वापर केल्यामुळे गैरप्रकार घडले असतील; पण याचा अर्थ असा निघत नाही की, हा वापरच चूक आहे. विज्ञानाची दिशा ही विकासाकडे प्रगतीकडेच असते. काळाची चक्रे परत फिरवून मागे जाता येत नाही. हे ध्यानात घ्यायला हवे.



निसर्गशेतीचं अध्यात्मिक गारूड उभं करण्यात लोकांचे वेगळे असे स्वार्थ आहेत. आज मोठ्या प्रमाणात छोट्या गावांचं किंवा शेतीचं शोषण करून शहरी व्यवस्था उभी राहिली आहे. याचे दुष्परिणाम सगळ्यांना जाणवायला लागले आहेत. मग या अपराधी भावनेतून स्वतःचा दोष लपवण्यासाठी शेतीतल्या विविध गोष्टींबाबत मोठ्याप्रमाणात ओरड हाच वर्ग करत राहतो. उद्योगक्षेत्राला दोन वर्षांपूर्वी साडेचार लाख कोटींची करमाफी देण्यात आली होती; पण त्याबाबत चकार शब्द न बोलता शेतीक्षेत्राला दिल्या गेलेल्या ८० हजार कोटी कर्जमुक्तीची ओरड झाली. शासनाला नियमित स्वरूपात करोडो रुपयांनी डुबवणारा शहरी वर्ग शेतकऱ्याला इन्कम टॅक्स नाही म्हणून बोंब मारतो, त्यामधली मेख हीच आहे. शेती असो की आधुनिक जगातील आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशा कितीतरी गोष्टी असो, यांच्या स्वागताची उदार भूमिका आपण घेतली पाहिजे. नवनवे बदल स्वीकारण्याची एक फार मोठी अशी भारतीय परंपरा आहे. आपला एकमेव देश असा आहे, की ज्याने विविध आक्रमणं पचवून स्वतःची अस्मिता विविधतेसह टिकवून ठेवली. हे सगळं माहीत असताना परत एकदा जुन्या कर्मठ विचारांनी आधुनिकतेला विरोध करायचा, या मानसिकतेला काय म्हणावे?

आमीर खानचा कार्यक्रम ज्यांनी ज्यांनी पाहिला असेल ते जवळपास सगळे दूरदर्शनसंच त्यातील तंत्रज्ञान हे सगळं आधुनिक विज्ञानाचीच देणगी होय असं असतानाही शेतीमध्ये काही आधुनिक गोष्टी येत असतील तर त्याबाबत नकारात्मक दृष्टीकोन का ठेवायचा? बीटीचं युग संपलं आता जीएम युग येऊ घातलं आहे. खुल्या मनाने त्याचं स्वागत करूया.

# निसर्गशेतीवरील किडी

पुण्याच्या 'बळीराजा' मासिकातर्फे १७, १८ एप्रिल १९९४ रोजी पुण्यामध्ये नैसर्गिक शेती या विषयावर एक चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्राचे उद्‌घाटन करताना श्री. शरद जोशी यांनी केलेल्या भाषणाचा गोषवारा शेतकऱ्यांना चतुरंग शेतीतील सीताशेतीबाबत बऱ्याच सूचना देऊन जातो. सद्या रसायने तथा कीटकनाशकांच्या शेतीतील वापरासंदर्भात होत असलेल्या चर्चेच्या अनुषंगाने संघटकच्या वाचकांसाठी हा लेख पुनः प्रकाशित करीत आहोत.



शरद जोशी

### निसर्ग-विज्ञान-व्यापार

विषय : नैसर्गिक शेती तथा निसर्गविज्ञान. या 'तथा' शब्दाने थोडा गोंधळ होण्याची शक्यता आहे. नैसर्गिक शेती म्हणजेच निसर्ग विज्ञान शेती हे काही खरे नाही. शिबिराचे सूत्रधार 'बळिराजा मासिक' आधुनिक व्यापारी शेतीचे मासिक अशी बिरूदावली मिरवते. निसर्गविज्ञान शेतीची चर्चा आधुनिक व्यापारी दृष्टिकोनातून घडवून आणण्यासाठी महाराष्ट्रात जागोजागी उदंड कष्ट, प्रयास, तपस्या करणारी निष्ठावान मंडळी एकत्र जमा झाली आहेत.

### शब्दांचे मोठे पीक

विषय सध्या लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. गेल्या वर्षभरांत अर्ध्या डझनावर देशी-परदेशी विद्यार्थी, या विषयावर डॉक्टरेट करणारे, मला भेटले आहेत. शेतकऱ्यांपेक्षा हा विषय विद्वानात अधिक लोकप्रिय झाल्याने शब्दांचे पीक मोठे उदंड आले आहे. कोणी वैकल्पिक (Alternative) शेती म्हणतो, म्हणजे हरित-क्रांती घडवून आणण्याकरिता वापरलेल्या सुधारित बियाण्यांची वाणे आणि वरखते व औषधे यांच्या उपयोगाने होणाऱ्या शेतीला पर्याय देणारी शेती, कोणी फक्त पेट्रोलियमविरहीत शेती म्हणतो, कोणी जैविक, कोणी इर्ळोंळल शेती. कोणी म्हणते पर्यावरणी (Ecological) शेती, कोणी शाश्वत (Sustenable) शेती,कोणी भूनाग (Vermiculture) शेती इ. शब्दप्रयोग आहेतच. इंग्रजीत शब्दांची लयलूट आणिक मोठी आहे. Organic, Natural, Bio-Dynamic, Permaculture इ.इ.

### नैसर्गिक शेतकऱ्यांच्या छटा

फारसे तपशिलात न जाता सांगायचे झाले तर या सगळ्या प्रकारांमध्ये समानता एवढी की शेतीच्याबाहेरून येणाऱ्या, विशेषतः कारखानदारीत तयार होणाऱ्या वस्तूंचा, निविष्ठांचा वापर कमी. निसर्गशेतीत काही प्रखर निष्ठावान आहेत. एखाद्या सोवळ्या ब्राह्मणाप्रमाणे रसायनाच्या सावलीचाही विटाळ त्यांना खपत नाही. एक कण जरी रसायन आले तरी त्यामुळे सगळे नैसर्गिक चक्र बिघडून जाण्याची धास्ती त्यांना वाटते. बाकीच्यांची, आवश्यकता पडल्यास थोडीफार तडजोड करण्याची तयारी असते. या नव्या चळवळीत निसर्गवादी आहेत, तत्त्वज्ञानी आहेत, धर्मवादी आहेत पर्यावरणवादी आहेत, काही काही तर शेतकरीसुद्धा आहेत.

### दुसरा एक प्रवाह

निसर्गशेतीच्या प्रवाहाबरोबर दुसरीही एक जबरदस्त विचारधारा आहे. नुकतेच महाराष्ट्रातील चार-पाचशे शेतकरी इस्रायलला जाऊन आले. शिवाय अर्थव्यवस्थेच्या खुलीकरणामुळे, निर्यातीसाठी, बी-बियाणे इत्यादींच्या आयातीसाठी अनेक तरुण शेतकऱ्यांचा परदेशी शेतकी तंत्रज्ञानाशी संबंध आलेला आहे. या मंडळींच्या तोंडची भाषा निसर्गशेतीवाल्यांपेक्षा अगदीच वेगळी आहे. आधुनिक व्यापारी शेतीकरीता शेतीमालाचे हुकमी उत्पदन घेतले पाहिजे, निर्यातीचे करारमदार झाले आणि उत्पादनच झाले नाही तर जागतिक बाजारपेठेत आपल्याला स्थान राहणार नाही हे त्यांना चांगले समजते आहे. हुकमी उत्पादन झाले पाहिजे एवढेच नव्हे तर ते उत्पादन ठराविक गुणवत्तेचे झाले पाहिजे; रंग, रूप, आकार, गंध, स्वाद, स्पर्श, चव, शुद्धता अशा सगळ्या कसोट्यांना माल उतरला पाहिजे. त्यांकरिता प्रचंड आच्छादित घरे बांधून उष्णतामान, पाणी, खते, औषधे यांचा ठराविक आणि नियमित पुरवठा करणाऱ्या जवळपास कारखानदारी तंत्रज्ञानाकडे ते वळत आहेत. माल तयार झाल्यानंतरही त्याची तोडणी, शीतकरण, आवेष्टन, साठवणूक, विक्री, प्रक्रिया, निर्यात याकरिता अधिकाधिक कारखानदारी साधने उपयोगात आणण्याची आवश्यकता ते हिरीरीने मांडतात.

एकट्या महाराष्ट्र राज्यातच शेतकऱ्यांमध्ये आणि शेतीसंबंधी दोन विचारप्रवाह सारख्याच हिरीरीने मांडले जात आहेत. एक 'निसर्गशेतीचा' आणि दुसरा 'उद्योजक शेतीचा'.

उद्योजक शेतकरी निसर्गशेतीच्या तसे विरोधी नाहीत, द्राक्षे, फुले, स्ट्रॉबेरी यांची निर्यात करणारी अनेक शेतकरी मंडळी आग्रहाने वरखतांचा वापर टाळतात किंवा मर्यादित ठेवतात. औषधांच्या उपाययोजनांत मात्र काही किरकोळ अपवाद सोडल्यास रासायनिक औषधांचा वापर हे उद्योजक शेतकरी करतात. हा कलही हळूहळू बदलेल. परदेशात जैविक शेतीमालाचा आग्रह वाढतो आहे. साहजिकच आपल्या देशातील पंचतारांकित मंडळीही जैविक मालाचा आग्रह धरू लागली आहेत. बाजारपेठेचा हा कल राहिला तर उद्योजक शेतकऱ्यांना रासायनिक खतांबरोबरच औषधांचा वापर कमी करावा लागेल. बाजारपेठेत भारताची जवळ जवळ मक्तेदारी होऊ शकेल. या दृष्टीने ही मंडळी निसर्ग शेतीचे महत्त्व मानतात.

### रासायनिकाचे पुरस्कर्ते नाहीत

'निसर्गशेती' आणि 'रासायनिक शेती' असे दोन शब्दप्रयोग वापरले तर रासायनिक शेतीचे खंदे पुरस्कर्ते अथवा समर्थक असे कुणीच नाही. रसायनेच वापरा, जैविक खते वापरूच नका असा अतिरेक रासायनिकात सापडत नाही. नैसर्गिक खते चांगली पण पुरवठा म्हणून थोड्याफार प्रमाणात रसायनाचा उपयोग करणे सोयीचे आणि फायद्याचे असते एवढीच काय ती त्यांची मांडणी आहे. हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानाचे खंदे पुरस्कर्ते कोणी नाहीत; पण गेल्या ३० वर्षातील यातंत्रज्ञानाच्या वापराचे समर्थन करणारे अनेक आहेत. हरितक्रांती तंत्रज्ञानाला ३० वर्षांपूर्वी पर्याय नव्हता. जर का तो वापर झाला नसता तर देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला नसता, लक्षावधी माणसे उपासमारीत सापडली असती असे त्यांचे म्हणणे आहे. मला असे वाटते की या विषयावर

मतभेद नसावा.

### चहूकडे निसर्गशेतीच

कित्येक शतके हिंदुस्थानात सारी निसर्गशेतीच चालू आहे. रसायनांचा उपयोग या शतकातच आला आणि त्यांतही विशेष करून गेल्या ३० वर्षांतच आला. आजही वरखतांचा वापर इतर देशांच्या तुलनेने अगदीच कमी आहे. तो वापर खात्रीशीर पाणीपुरवठा असलेल्या क्षेत्रात; गहू, भात, ऊस, कापूस अशा कांही मोजक्या पिकांत आहे. बाकी शेतीत रसायनांचा वापर अगदीच किरकोळ आहे. देशातील जवळ जवळ ४० % शेतीत आजदेखील कणमात्र युरिया पडत नाही. निसर्गशेतीच्या शेकडो वर्षांत देशांत दुष्काळ पडत राहिले, माणसे उपाशी मरत राहिली. आजही ४० % शेतकरी निसर्गशेती करतात तरी देश अडचणीतच आहे. तेव्हा निसर्गशेती सगळ्या रोगांवरचा एक मोठा उपाय आहे असली भाषा विद्वानांनी खुशाल वापरावी, शेतकऱ्यांना ती परवडणारी नाही.

निसर्गशेतीच्या विरुद्ध कोणीच नाही. या झेंड्याखाली काही प्रवृत्ती मात्र मनात काही प्रश्नचिन्हे आणि भीती तयार करतात.

### धर्मवादाचे भूत

निसर्गशेतीच्या निमित्ताने एक नवा धर्मवाद शेतीमध्ये घुसविण्याचा प्रयत्न होतो आहे असा संशय घेण्यास जागा आहे. बाबामहाराजांचे अनेक शिष्यवर आणि स्वतःला गांधीवादी म्हणवणारे आणि जन्माच्या अपघाताने मिळालेल्या त्या धर्माच्या वारशाचा गर्व मिरविणारे अनेक लोक निसर्गशेतीच्या चळवळीत अग्रभागी आहेत. शेतकऱ्यांनी निसर्गशेती चळवळीतील धर्मवाद्यांपासून आणि समाजवाद्यांपासून सावध राहिले पाहिजे. मी हा मुद्दा आवर्जून मांडतो, कारण मला हा धोका फार भयानक वाटतो. निसर्गशेतीचे प्रयोग करणाऱ्यांपैकी अनेकजण धर्मवादी तत्त्वज्ञानाने प्रेरित झालेले आहेत. खुद्द 'मासानोबु फुकूओका' यांची निसर्गशेतीची मांडणीच धर्मावर भर देते. त्यांनी म्हटले आहे,

''नैसर्गिक शेतीमध्ये धर्म, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांचा संयोग झाला आहे हे विशेषतः भारतीयांनी जाणले आहे. नैसर्गिक शेती हेच परम सत्य, खरा साधनमार्ग व यथार्थ शेतीपद्धती होय ही गोष्ट त्यांना आकळली याने मला धन्यता वाटली.''

पुण्याच्या आसपास वावरांवर गायत्री मंत्राचा प्रयोग सांगणारे 'विज्ञानंद' झाले. तसेच 'निसर्गशेतीतील धर्मवादी' शेतकऱ्यांना धोका देऊ पाहत आहेत. रासायनिक शेतीच्या दुष्परिणामांनी शेतकरी पोळलेला आहे याचा फायदा घेऊन 'विज्ञान हरले, अध्यात्म जिंकले' अशा आरोळ्या ठोकायला त्यांनी सुरुवात केली आहे. निसर्गशेतीची गोडी शेतकऱ्यांना लागली की मग जुन्या काळच्या ख्रिश्चन मिशनऱ्याप्रमाणे अध्यात्मात बाटवण्याचे हे कारस्थान आहे. जनावरांचे मूत्र शेतीला फायदेशीर पण त्यात गोमूत्र सर्वात फायदेशीर असा प्रचार गोपूजक धर्मवादी करतात. अर्धवट शास्त्रीय परिभाषेत त्याचे थातूरमातूर समर्थन देऊन लोकांना भुलवतात. ज्या ज्या देशात एक वशिंडाची गाय आहे तो तो देश आणि तेथील पर्यावरण उद्‌ध्वस्त झाले आहे. तरी त्या गाईचे देव्हारे माजवतात; ज्योतिष शास्त्राच्या आधाराने वैदिक शेती करण्याची शिफारस करतात. रायानिक शेतीचा पराभव झाला असेल, नसेल पण विज्ञानाचा पराभव झालेला नाही, चुकीच्या तंत्रज्ञानाचा पराभव झाला आहे. विज्ञाननिष्ठा जिंकत आहे. नफ्याची प्रेरणा सर्वात सबळ आणि सुष्ट प्रेरणा सिद्ध झाली आहे. ही दोन मूल्ये रासायनिक शेतीबरोबर सोडली तर घंगाळातील गढूळ पाण्याबरोबर त्यात न्हाऊ घातलेले बाळही फेकून दिल्यासारखे होईल.

### कांचनमुक्तीचे कांचनमृग

धर्मवाद्यांप्रमाणेच एक वेगळे अध्यात्म सांगणारी मंडळी निसर्गशेतीत मिरवत आहेत. यात प्रामुख्याने गांधीवादी, सर्व सेवा संघवाले कांचन मुक्तिवादी यांची गणना आहे. निसर्गशेतीचा पुरस्कार करताना ते शेतीतील व्यावसायिकतेवर उघड उघड हल्ला करतात. कोणी 'ॲलन जॉर्ज' हा त्यांचा आवडता लेखक, त्याचे एक वचन उद्‌धृत केले जाते.

''जेव्हा तेव्हा शेतकऱ्याने वास्तविक शेती करण्याचे, अर्थात तिच्यापासून आपली व आसपासच्या समाजाची आवश्यकता पूर्ती करण्याऐवजी आपले उत्पादन दूर, लांब पाठवून पैशाच्या लालसेने विकण्यास सुरुवात केली व तिला व्यापाराचे रूप दिले तेव्हा त्याने संकट विकत घेतले व जमिनीचे शोषण करून हिरव्यागार शेतीचे वाळवंट केले.''

''स्वतः व गाव यांच्या स्वावलंबनाऐवजी नफ्यासाठी शेती करील'' या बुद्धीने शेतकरी निसर्गापासून दूर गेला आणि त्याने स्वतःचे, देशाचे नुकसान केले अशी मांडणी 'सर्व सेवा संघ'वाले करतात.

### दुढ्ढाचार्यांची मळमळ

आपले हित कशात आहे, आपल्या पोराबाळांचे, कुटुंबाचे हित कशात आहे हे शेतकऱ्यांना कळत नाही; शेतीत काय पिकवावे याचे शहाणपण त्यांनी 'आम्हाकडून' घ्यावे, जग पैशाच्या मागे लागले तरी शेतकऱ्यांनी मात्र सेवाभावी जीवन काढावे अशी दांभिकता या विचारसरणीत आहेच. त्याखेरीज, वैयक्तिक नफ्यापेक्षा काही व्यापक उच्च तत्त्वांच्या आधाराने देशातील साधनसंपत्तीचा वापर अधिक चांगला होतो, असाही एक सिद्धांत आहे. सर्वसामान्य संसारी लोकांना त्यांचे हित काय कळणार? षड्‌रिपूंच्या कर्दमात ते बिचारे गटांगळ्या खात असतात. आम्ही परमेश्वरी ज्ञानाचे वारसदार त्यांना मोक्षाचा मार्ग दाखवतो असा अहंकार धर्मवाद्यांनी वर्षानुवर्षे मिरवला. गहू किती पिकवावा, कोथिंबीर किती लावावी हे शेतकऱ्यांना काय समजणार? त्यासाठी राजधानीतील नियोजन मंडळात बसलेली 'दुढ्ढाचार्य' मंडळी आकडेमोडी करून निर्णय घेतील ही समाजवाद्यांची आणि नेहरूवाद्यांची मांडणी. व्यक्तीच्या प्रेरणा देशघातक असतात आणि देशहित कळते ते आध्यात्मिक किंवा अर्थशास्त्री दुढ्ढाचार्यांना. कारण त्यांच्याकडे काही 'महान व्यापक दृष्टिकोन'असतो. समाजवादी त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या आधाराने समाजावर हुकुमत बसवू पाहत होते. गांधीवादी तशाच तोंडवळ्याचा कार्यक्रम आध्यात्माच्या पायावर देत आहेत.

व्यक्तींनी नफ्याचा पाठपुरावा केल्यामुळे देशाचे नुकसान होते या वावदूक कल्पनेचा जागतिक ऐतिहासिक पराभव झाला आहे.

### स्वातंत्र्याच्या कक्षा

नैसर्गिक शेतीत निसर्गाशी सहजीवन साधले जाते, नैसर्गिक शेती आत्मिक सुख आणि आनंद देते, त्याबरोबर नैसर्गिक शेतीत तयार होणारा माल अधिक पौष्टिक, चवदार असतो. रासायनिक खतांतून तयार झालेल्या मालाच्या सेवनाने माणसाचा स्वभाव बिघडतो, आध्यात्मिक अधःपतन होते असेही वेगवेगळे युक्तिवाद ऐकवले जातात. कोणत्या पदार्थाच्या सेवनाने मनुष्यप्राण्याची आध्यात्मिक उन्नती किंवा अवनती होते हा माझ्या अभ्यासाचा विषय नाही. नैसर्गिक शेतीतील माल अधिक रुचकर, पौष्टिक असतो हे मानण्यास मी तयार आहे; पण याच कारणाने नैसर्गिक शेती शेतकऱ्यांना आणि ग्राहकाला मान्य होईल ही कल्पना मनुष्यस्वभावाच्या चुकीच्या निदानावर आधारलेली आहे. स्वामी चिन्मयानंद एक अनुभव सांगत. पहाटे चार वाजता उठून तांब्याभर पाणी प्याले तर कोठा साफ राहतो, प्रकृती चांगली राहते, उत्साह वाटतो हे सगळे खरे; पण असा अनुभव घेऊनही उषःपान करणारे विरळाच. याउलट, धूम्रपानाने प्रकृती बिघडते, कॅन्सरसारखे भयानक रोग होतात हे माहीत असूनही एका झुरक्याच्या तलफेसाठी माणसे वेळी अवेळी कोसच्या कोस अवघड रस्त्याने पायी चालत जातात. नैसर्गिक शेतीतून आरोग्य, शांती मिळत असेल पण आरोग्य-सुख-शांती ही मनुष्यप्राण्याची उद्दिष्टे नाहीत; माणसाचे उद्दिष्ट स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याचे असते. पोटॅशिअम सायनाइडसारख्या जहाल विषाची केवळ चव कळावी आणि मरण येण्याआधी ती लिहून ठेवता यावी

यासाठी अनेकांनी प्राण गमावले आहेत असे म्हणतात.

रासायनिक शेतीतील इतर दोष काहीही असोत, त्यात उत्पादनावरील शेतकऱ्याचे नियंत्रण अधिक सज्जड आहे. रासायनिक शेतीला जो काही पर्याय निघेल तो माणसाच्या स्वातंत्र्याच्या कक्षा बंदिस्त करणारा असेल तर त्याची स्वीकृती कठीण आहे.

## पर्यावरणवाद्यांची भयानक भकिते

निसर्गशेतीच्या चळवळीला धर्मवाद्यांप्रमाणेच पर्यावरणवाद्यांचाही मोठा धोका आहे. शाश्वत शेती किंवा सदा सर्वकाळ चालणारी शेती अशी कल्पना पर्यावरणवादी मांडतात. वर्तमान पिढीचा विकास उद्याच्या पिढ्यांच्या वारसाला धक्का न लागता झाला पाहिजे, जेणेकरून ही सुंदर पृथ्वी आणि त्यावरील प्राणिमात्र आणि मानव यांची वस्ती सर्वकाळ अबाधितपणे चालू राहील असेच तंत्रज्ञान वापरले पाहिजे अन्यथा पृथ्वीचा नाश अटळ आहे असा त्यांचा आग्रह आहे.

जगाच्या इतिहासात प्रत्येक पायरीला आता ही पृथ्वी बुडते, आता विनाश जवळ आला अशा आरोळ्या ठोकणारी मंडळी दृष्टीस पडतात. पहिली आगगाडी भूगोलावरून धावू लागली तेव्हा सृष्टीचा विनाश जवळ आला असे आधुनिक पर्यावरणवाद्यांचे पूर्वज करवादले होते. पहिले कारखाने उभे राहू लागले तेव्हा ही सारी हरित सृष्टी आता लुप्त होणार याची चिंता पडलेल्यांत टॉलस्टॉय, रस्कीन यांचीही गणना आहे. लोकसंख्या भूमिती श्रेणीने वाढते आणि अन्नधान्याचे उत्पादन मात्र गणिती श्रेणीने वाढते तेव्हा मनुष्यजात भूकबळीने नष्ट होणे अपरिहार्य आहे असे भाकीत यांच्याच पूर्वजांनी वर्तवले होते. ही सगळी भकिते खोटी पाडून माणूस जिवंत राहिला, एवढेच नव्हे तर तो सुधारला, जास्त सुखी झाला हेही सत्य आहे.

## ऊर्जास्रोतांचा कारकुनी हिशेब

ठराविक पेन्शन मिळणारे म्हातारे आपले सगळे दैनंदिन जीवन त्या रकमेत बसवण्याचा आरखडा तयार करतात, म्हणजे मरेपर्यंत आपणास काही कमी पडू नये. असला हिशेब मानवजात करत नाही. मनुष्य धडपडतो, स्वतःच्या 'स्वातंत्र्याच्या कक्षा' रुंदावण्याकरिता भगीरथ प्रयत्न करतो, निसर्गाची रहस्ये आणि प्रमेये शोधून काढतो. बैलाच्या ताकदीपासून वारा, पाणी, कोळसा, वीज, पेट्रोलियम, अणुपर्यंत ऊर्जेचे अनेक स्रोत त्याने वेसण घालून सेवेस ठेवले आहेत. उरलेल्या पेट्रोल स्रोतांचा नेमका हिशेब मांडून मनुष्यजातीच्या पुऱ्या भविष्यात ते पुरतील अशा गतीने जपून जपून वापरण्याची पद्धती माणसाच्या स्वभावाला जमणारी नाही. पेट्रोल संपले तर त्या जागी दुसरी काही साधने तयार करू, अणुंचा वार करू, समुद्रांच्या लाटांना कामी लावू, सूर्याची ऊर्जा वापरू आणि एक दिवस सूर्यच विझत आला तर त्या जागी एखाद्या तारकेला ओढीत आणून पेटवून देऊन नवा सूर्य उभा करण्याची त्याची जिद्द आहे. पर्यावरणवाद्यांनी प्रगतीला खीळ घालण्याची कोशीस शतकानुशतके केली, पण माणूस थांबला नाही. कर्तबगारी गाजवू इच्छिणाऱ्या पोराला घरातील म्हाताऱ्यांनी सावधगिरीचा सल्ला द्यावा हे योग्यच; त्याचा काही ना काही उपयोग होतोच. पर्यावरणवाद्यांत काही भली मंडळीही आहेत. मनुष्याच्या भवितव्याविषयी त्यांना वाटणारी चिंता खरीखुरी आहे. अन्यथा या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि संस्थांना वापरणे कठीण व्हावे इतकी साधने, संपत्ती आणि सन्मान अगदी सहजासहजी उपलब्ध झाली नसती.

## अशास्त्रीय शाश्वती

पर्यावरणवाद्यांच्या सद्हेतूबद्दल, सद्भावनेबद्दल शंका घेण्याचे कारण नाही पण त्यापलीकडे त्यांच्याकडे काही असले तर ते तपासून घ्यावे लागेल. उदाः त्यांची शाश्वततेची कल्पना कितपत शास्त्रीय आहे? सातवी-आठवीच्या पदार्थ विज्ञानशास्त्राच्या पुस्तकात वेगवेगळ्या तऱ्हेच्या कारंज्यांचे प्रयोग केले जातात. थोडीफार बुद्धी असलेले सर्व विद्यार्थी त्या वयात शाश्वत कारंजा तयार करण्याच्या प्रयत्नास लागतात. शाश्वतता ही विज्ञानाच्या मूलभूत नियमानुसार अशक्य आहे. 'जातस्यहि ध्रुवो मृत्यु:।' तेव्हा ही पृथ्वी चिरंतन कालापर्यंत चालणारी आहे ही कल्पना शास्त्रीय नाही. पृथ्वीसारखे ग्रह या अफाट विश्वात रोज एक या गतीने तरी खपत असावेत.

शक्य होईल तितका पृथ्वीचा बचाव करावा याबद्दल कोणी वाद घालत नाही; पण खांद्यावर शबनम अडकवून फिरणाऱ्या पर्यावरणवादी कार्यकर्त्यांना पृथ्वीच्या जीवनमरणाची चिंता जे.आर.डी. टाटांपेक्षा अधिक आहे असे मानायला काही कारण दिसत नाही. पृथ्वी जगवायची कशी याचे पर्यावरणवाद्यांना काही विशेष ज्ञान झाले आहे असेही दिसत नाही. झाडे लावणे हा त्यांचा आवडीचा कार्यक्रम. त्यामुळे पाऊस पडतो, निसर्गाचे संतुलन राहते, असा त्यांचा लाडका सिद्धांत; पण सर्व महाराष्ट्रभर जंगलेच जंगले असताना सतत तेरा वर्षे पाऊस पडला नाही आणि दुर्गादेवीचा कराल दुष्काळ झाला, हे कसे? हे ते सांगू शकत नाहीत. सगळा राजस्थान भाक्रा-नान्गलच्या पाण्याने हिरवागार झाला तर मान्सूनचे चक्र थांबेल काय? आणि बाकी सारा देश वाळवंट बनेल काय? या शक्यतेबद्दल ते काहीच ठामपणे सांगू शकत नाहीत. ''पृथ्वीचा विनाश प्रदूषणापेक्षा एखाद्या ग्रहखंडाच्या टकरीने होण्याची शक्यता अधिक आहे. अशी टक्कर टाळायची तर त्याकरता लागणाऱ्या औद्योगिक उत्पादनाने प्रदूषणाचे प्रमाण आणखीनच वाढणार हे नक्की.

## जुने समाजवादी

कोणत्याही उद्योगाचा पर्यावरणावर काही ना काही अनिष्ट परिणाम होतोच. कोणत्याही प्रकल्पातील असले दोष दाखवून त्यांना विरोध करणे इतपतच पर्यावरणवाद्यांचे ज्ञान. खुल्या व्यवस्थेपेक्षा समाजवादी नियोजनाने विकास जलद होतो हा सिद्धांत खोटा ठरला, जग खुल्या व्यवस्थेकडे जाऊ लागले तेव्हा अर्थकारणाच्या सबबीवर किंवा पर्यावरणाच्या बागुलबुवाने तरी 'सरकारशाही व्यवस्था' काही काळ टिकवावी या बुद्धीने बहुत सारे जुने समाजवादी आज पर्यावरणवादी झाले आहेत.

## दोषास्पदाकडून दोषात्पदाकडे

प्रत्येक समाजव्यवस्थेच्या स्वतःच्या पर्यावरण समस्या असतात. निसर्गशेतीचा अंमल चालू असताना मलेरिया, कॉलरा, देवी, नारू, खरूज असल्या रोगांनी सर्वदूर थैमान घातले होते. त्याबरोबर दुसऱ्या काही समस्या तयार झाल्या. त्या सोडवण्याच्या प्रयत्नांत मनुष्य गढला आहे. समाज एका दोषास्पद स्थितीतून दुसऱ्या दोषास्पद स्थितीत जातो आणि नवे दोष करता करता आणखीन नवीन समस्या डोक्यावर घेतो. मनुष्याच्या सांत जीवनात 'शांती'ला स्थान नाही. 'अशांती'तून सुटका कदाचित निर्वाणांत किंवा मोक्षांत मिळत असेल; एरवी नाही.

## माणूसही निसर्ग आहे

निसर्ग हा नेहमीच श्रेष्ठच असतो, कल्याणकारीच असतो असा पर्यावरणवाद्यांचा दुसरा एक दृढ विश्वास आहे. मनुष्यच काय तो दुष्ट आहे आणि तो निसर्गाच्या मंगलकार्यात आड येतो अशी त्याची ठाम कल्पना आहे. सर्वकल्याणकारी निसर्गाने अशी अभद्र मनुष्यजात जन्माला घातलीच का? आणि तिचेच वर्चस्व प्रस्थापित होऊ दिले कसे? असले तार्किक प्रश्न निसर्गवाद्यांच्या भावविश्वात सामावत नाहीत.

निसर्ग सदाच कल्याणकारी असतोच असे नाही. निसर्ग प्रकृतीने संख्याशास्त्रीय आहे, तटस्था आहे. कधी त्याला वेसणही घालावी लागते. निसर्ग आणि माणसाचे शत्रुत्व नाही. एकाच कुटुंबातील स्त्री-पुरुषांसारखे त्यांचे नाते आहे. नवरा-बायकोत तरी सदसर्वकाळ गोडीगुलाबी आणि चांदणी रात्र असते असे थोडेच आहे!

## अर्थकारण टाळता येत नाही

निसर्गशेतीच्या पंढरपूरच्या वारीत धर्मवादी, समाजवादी, पर्यावरणवादी हौशा-नवशा-गवश्यांप्रमाणे घुसले आहेत, त्यांच्याविषयी शेतकऱ्यांनी सावध राहणे महत्त्वाचे आहे.

## घाट्यातील शेती

रासायनिक शेतीच्या अनुभवाने शेतकरी पोळला आहे, भांबावला आहे. त्याला आपल्या नादी लावण्याच्या प्रयत्न करणारे अनेक आहेत, त्यांच्यापासून सावध राहिले पाहिजे; पण मग शेतकऱ्यांनी मार्ग घ्यावा कोणता? या प्रश्नाकडे वळण्याआधी एक महत्त्वाचा मुद्दा मांडणे आवश्यक आहे. निसर्गशेतीकडे वळलेल्या सगळ्या शेतकऱ्यांचा अनुभव एकसारखा आहे. रसायनांमुळे त्यांचे उत्पादन घटत चालले होते, जमिनीचा कस उतरत होता याची जाणीव त्यांना निसर्गशेतीची सुरुवात केल्यानंतर झाली. रासायनिक शेती करत असताना ही शेती आर्थिकदृष्ट्या परवडत नाही हे त्यांना सगळ्यांना उमजले होते आणि या जाणिवेतूनच त्यांनी परिवर्तन घडवून आणण्याची धडपड सुरू केली. शेतीतील घाट्याचे कारण रासायनिक तंत्रज्ञान होते काय? डंकेल प्रस्ताव आणि गॅट करार यांच्यासंबंधात हिंदुस्थान सरकारने जे दस्तावेज जिनिव्हात सादर केले त्यावरून आता एक गोष्ट स्पष्ट झाली, की हिंदुस्थानातील शेतकऱ्यांवर सरकारने जाणीवपूर्वक किमान ६९ टक्क्यांची (-) उणे सबसिडी लादलेली होती. शाश्वत शेतीचा उद्घोष करणाऱ्यांनी, शेतीप्रश्नातील सर्व काही आपणाला समजले, उमजले आहे असा डौल मिरवणाऱ्या लोकांनी सरकारच्या या धोरणाविषयी आपले तोंड कधी का उघडले नाही? याचा जबाब देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणाचा आव आणून पुढे येणाऱ्या सगळ्या विद्वानांना, शास्त्रज्ञांना, पुढाऱ्यांना, कार्यकर्त्यांना शेतकऱ्यांनी खडसावून विचारले पाहिजे, 'सरकार ठरवून सवरून ७० टक्क्यांनी आजपर्यंत आम्हाला लुटत आले याविषयी तुम्ही एक वाक्य बोलला नाही, शेतकऱ्यांना सबसिडीचा मोठा फायदा मिळतो, त्यांच्या मिळकतीवर करदेखील नाही बघा हो! अशी आमच्या दारिद्र्याच्या दुःखावर डागण्या देणारी भाषा चौफेर बोलली जात असताना तुम्ही तिचा रतिमात्र विरोध केला नाही, का ते सांगा? अन्यथा, तुमच्या आतड्यात शेतकऱ्यांविषयी तिळमात्र कणव, कळकळ आहे यावर आमचा विश्वास बसूच शकत नाही, असे खडसावून सांगितले पाहिजे.

डंकेलवर सही झाली; पण म्हणजे शेतकऱ्यांच्या लुटीचे धोरण सरकार सोडून देणार आहे असे अजिबात नाही. शेतकऱ्यांनी बाजारात निविष्ठा खरीदण्याऐवजी आणि बाजारात माल विकण्याऐवजी स्वावलंबी आणि स्वयंभू निसर्गशेती केली म्हणजे शेतकऱ्याची लूट आपोआप थांबेल ही कल्पनाही चुकीची आहे. भारतीय संविधानात ९ वे परिशिष्ट घालून स्वतःच्या जमिनीच्या बचावासाठी शेतकऱ्यांना न्यायालयाची पायरी चढण्याची मुभा न ठेवणारे सरकार निसर्गशेतकऱ्याच्या शेतावर उतरून माल उचलून घेऊन जाण्यास कचरेल अशा भोळ्याभाबड्या आशेने नैसर्गिक शेतीकडे वळत असाल तर ती आशा खोटी आहे.

## गच्चीवरील शेतीचे अर्थकारण

निसर्गवाद्यांतील भली भली माणसे शेतीच्या अर्थकारणाचा प्रश्न दुय्यम आहे असे दाखवण्याचा प्रयत्न करतात; आपण विज्ञानवादी आहोत, प्रयोगवादी आहोत असा घोष चालू असतानाच 'गच्चीवरील शेती' किंवा 'अर्ध्या गुंठ्यात एका कुटुंबाचे पोषण' असल्या कल्पना मांडताना हिशेबात हातचलाखी करून धोका देतात. एक पिशवीभर केरकचरा, उष्टेमाष्टे, शेण, कुजलेले पदार्थ एकत्र केले तर खर्च काहीच नाही; पण त्यातून कुटुंबाला पुरतील इतकी केळी, आंबे उत्पादन करता येतात या युक्तिवादातली हातचलाखी उघड आहे. बिनखर्चाने पोतेभर कुजलेले पदार्थ जमा करणे फारसे कठीण नाही; पण प्रत्येक शेतकऱ्याने अशी ५० पोती जमा करायची म्हटले तर स्वयंपाकघरातील उष्टेमाष्टेसुद्धा दुर्मिळ होईल आणि चढ्या किमतीने ते विकत घ्यावे लागेल. एका वेलीवरचा वनस्पतिशास्त्रीय प्रयोग लाखो वेलींना लागू पडतो; पण एका वेलीचे अर्थशास्त्र आणि २०० वेलींचे अर्थशास्त्र यात जमीनअस्मानचा फरक असतो.

## दोन गुंठे वांगी

असाच नजरबंदीचा खेळ बिहारमध्ये काही मंडळींनी केला. कोरडवाहू जमिनीत २ गुंठे वांगी पिकवली आणि त्याच्या आधाराने एकरी साडेतीन लाख रुपये फायदा होऊ शकतो असा दावा मांडला. निसर्गशेतीचे प्रयोग करताना अर्थशास्त्राच्या नियमातून आपण सुटून जाणार आहोत अशी कल्पना कोणाही निसर्ग शेतकऱ्याने ठेवू नये.

एवढे सगळे सांगितल्यानंतर तरीही आता मी म्हणेन की, तीस वर्षांपूर्वी रासायनिक शेतीला पर्याय नव्हता. रासायनिक शेतीने जहाज ते रेशन दुकान ही परिस्थिती संपवली. आता काही फुरसत मिळाली आहे, उसंत मिळाली आहे, संकट टळले आहे, आता काही नवा मार्ग शोधण्याच्या कामास लागले पाहिजे.

## सम्यक पातळीवर निसर्गशेती

स्वातंत्र्यानंतर अधिक धान्य पिकवा मोहीम हाती घेतली गेली. धान्य तर अधिक पिकवायचे, पण त्याचबरोबर शेतकऱ्यांची लूटही करायची, शेतीत भांडवल निर्मिती होणार नाही अशी व्यवस्था राबवायची हे सरकारी धोरण अमलात आणण्याकरिता पडीक जमीन लागवडीखाली आणण्याची मोहीम हाती घेण्यात आली. त्या काळात जमिनीचा तिसरा भाग तरी पाळीपाळीने पडीक ठेवण्याची पद्धत होती, ती संपली. जैविक खतांसाठी जमिनीचा एक मोठा भाग राखून ठेवला जात असे, ती पद्धत बंद करून त्याही वावरांत शेती करायची असेल तर बाहेरून रासायनिक खते आणून टाकण्याखेरीज काही पर्यायच नव्हता. व्यापक प्रमाणावर निसर्गशेतीकडे वळायचे असेल तर आजच्या शेतजमिनीपैकी तिसरा भाग वने, कुरणे यांच्या वाढीसाठी नांगराखालून काढून घ्यावा लागेल. त्याचे आर्थिक परिणाम काय होतील, शेतीच्या स्तरावर काय होतील आणि देशाच्या स्तरावर काय होतील याचा अभ्यास झाला पाहिजे.

फळबागांच्या शेतीत झाडांच्या मधल्या जागेत उगवणाऱ्या पालापाचोळ्याने फळझाडांची खतांची पुष्कळशी गरज भागून जाते. धान्ये, कडधान्ये यांच्या शेतीत अशी काही शक्यता नाही. मग जैविक शेतीकडे वाटचाल करताना अन्नधान्य आणि कडधान्य यांच्या उत्पादनाकडे बऱ्याच अंशी पाठ फिरवणे अपरिहार्य होईल. हा मुद्दाही दृष्टीआड होता कामा नये.

सध्याची सर्व जैविक उत्पादने मलमूत्रादी उत्सर्जने पूर्णपणे वापरली तरी नत्र व स्फुरदाच्या आवश्यकतेची २० टक्केही पूर्ती संभव नाही असे काही तज्ज्ञ म्हणतात.

## उत्पादकतेची हरती शर्यत

रासायनिक शेतीतील उत्पादनाइतकेच उत्पादन नैसर्गिक शेतीत होते असे मला अनेकांनी आग्रहपूर्वक सांगितले आहे. फारशा तपशिलात न जाता हा मुद्दा मान्य करण्यास मी तयार आहे; पण नैसर्गिक शेतीतील काही अतिरेकी, संकरित वाणाचे बियाणेसुद्धा स्वीकारण्यास तयार होत नाही. जैविक अभियांत्रिकीच्या नव्या युगात तयार होणाऱ्या नवीन वाणांच्या बाबतीत अशी स्पर्धा करणे निसर्गशेतकऱ्यांना शक्य होणार नाही. उत्पादनात पाच-पाच, दहा-दहा पटीचा फरक पडू लागला. त्याबरोबर नेमका पाहिजे त्या गुणवत्तेचा माल जैविक अभियांत्रिकीने तयार करता येऊ लागला तर नैसर्गिक शेतीस बाजारात टिकाव धरणे दुष्कर होईल.

## विज्ञानाचा पर्याय

अन्नधान्याच्या स्वावलंबनाने काहीशी फुरसत मिळाली आहे. रसायनांवर

मर्यादेबाहेर निर्भर राहण्याचे कटू परिणाम समजले आहेत. शेतकऱ्यांना लुटणारी 'नेहरू व्यवस्था' संपण्याची चिन्हे दिसत आहेत. अशा परिस्थितीत एका नव्या शेती तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. नवे तंत्रज्ञान विद्यापीठातून येण्याची शक्यता नाही. मोठमोठ्या कंपन्या त्यांची उत्पादने खपवण्याचा प्रयत्न करतील आणि त्यांचा वापर हेच उच्च तंत्रज्ञान असे भासवतील. शेतकऱ्यांनी सावध राहिले पाहिजे. गंडादोरे विकणारे मांत्रिक, तांत्रिक, धर्मवादी, समाजवादी, पर्यावरणवादी शेतकऱ्याला घेरतील. कुणी त्याला सुबाभुळीचे बी विकेल, कुणी गांडुळे. या सगळ्यांपासून दूर राहून शेतकऱ्यांनी विज्ञानशेती करण्याची गरज आहे. विज्ञानशेती निसर्गशेती असेल किंवा नसेलही; आग्रह बुद्धी, अनुभव आणि तर्क यांच्या वापराचा पाहिजे. रसायनांचा आग्रह नको गोमूत्राचाही नको.

विज्ञान कोणा व्यक्तीस प्रमाण मानत नाही, कोणा ग्रंथासही प्रमाण मानत नाही; कोणा एका विचारप्रणालीलाही विज्ञान सदासर्वकाळ प्रमाण मानत नाही. सकल इंद्रियांचा जागरूकतेने वापर करून भोवतालचे जग कालच्यापेक्षा आज अधिक समजून घ्यावे; कणाकणाने आणि क्षणाक्षणाने ज्ञानाचे कण परिश्रमपूर्वक वेचावे आणि तरीही आपल्या निष्कर्षांबद्दल शंका बाळगावी विज्ञानाची प्रकृती आहे. पुरावा थोडा, श्रद्धा मात्र मोठ्या दाट हा धर्मवाद्यांचा स्वभाव. निसर्गशेतीच्या भक्तांनी विनाआधार श्रद्धा जोपासण्याचा मोह टाळला पाहिजे. विज्ञाननिष्ठेत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. ज्ञान हे पुढे जाणारे असते. मनुष्याची प्रगती होत आहे. भूतकाळात मागे जाऊन प्रगती होत नाही. रसायनांनी झटका दिला म्हणून पुन्हा एकदा खताच्या खड्ड्यात जाऊन बसले यात शहाणपण नाही.

## संचित अनुभवांची 'सीताशेती'

जगभरच्या विज्ञानाच्या अफाट प्रगतीत भारतीय शेतकऱ्याचा पाय टिकेल काय? 'नेहरू व्यवस्थे'त संशोधनाच्या चोरीला प्रतिष्ठा आली, परदेशी पुस्तक नकलणारे शास्त्रज्ञ ठरले. नियोजन व्यवस्थेत आम जनतेचा प्रगत तंत्रज्ञानाशी संपर्क विद्यापीठातील विद्वान आणि पंडित यांच्या माध्यमातूनच शक्य होतो. इतकी वर्षे सरकार ठरवेल तेवढीच परदेशी संशोधनाची फळे लोकांपर्यंत पोचण्याची मुभा. खुल्या व्यवस्थेत आता शास्त्रीय प्रगती तुकाराम ग्यानबाच्या डोळ्यांर्यंत येणार आहे. पाश्चिमात्य पद्धतीच्या संशोधनाची त्याची अजूनही औकात तयार व्हायची आहे.

पण पिढ्यान्‌पिढ्यांच्या संचित अनुभवांचा त्याला मोठा आधार आहे. गावोगाव, घरोघरी कितीतरी अनुभवांच्या गोष्टी सांगितल्या जातात. झेंडूची फुले लावल्याने मिरचीवर रोग पडत नाही. तांबडा राजगिरा पेरला तर लव्हाळा हटतो, असा संशोधनाचा कच्चा माल आमच्याकडे उदंड आहे. या साऱ्या समजुती प्रयोगाने तपासून पाहाव्या लागतील. प्रयोगशीलतेतून शेतीचे नवे विज्ञान आणि तंत्रज्ञान निघणार आहे; अंधश्रद्धेकडे जाऊन नाही.

## भविष्य मागे नाही, पुढे आहे

शेती तंत्रज्ञानाची पुढील दिशा कशी असेल? मी एक विज्ञानकथांतल्या प्रमाणे स्वप्नरम्य कल्पना मांडतो. त्याने कल्पना स्पष्ट होईल. रसायनांचा जमिनीवर, पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो तो असंतुलित आणि वारेमाप वापराने. झाडांना गरज असते एक कणाची, आपण फवारतो दहा मण. दोष रसायनांचा नाही, अतिरेकी वापराचा आहे. वारेमाप वापर होतो, कारण झाडाची नेमकी गरज काय हे आम्हाला समजत नाही. अवकाश संशोधनाने आज हे तंत्रज्ञान माणसाला उपलब्ध होते आहे. झाडाला नेमकी पोषक द्रव्ये कोणती हवी, औषधांचा डोस किती हवा याचे अचूक मोजमाप गणकयंत्रावर मिळाले तर रसायनांची पुष्कळशी नासधूस उधळपट्टी थांबेल आणि रासायनिक शेतीचे भयानक परिणाम पुष्कळसे सुसह्य होतील.

या पलीकडे जाऊन वनस्पतींना पोषकद्रव्ये आणि औषधे नेमक्या आणि मोजक्या प्रमाणात देण्याची काही युक्ती सापडली तर माझी खात्री आहे, येत्या पंधरा-वीस वर्षांत एका काळी शेतकरी झाडांवर औषधांचा फवारा मारून झाडे न्हाऊन काढत होता या कल्पनेने लोकांना हसू येईल. माणसाला गोळ्यांनी, सुई टोचून किंवा शिरेवाटे सर्व पदार्थ पोचवता येतात तशी काही युक्ती वनस्पतींच्या बाबतीत शोधली गेली तर कदाचित एका गावात वापरल्या जाणाऱ्या रसायनांवर सर्व देशाची शेती होऊ शकेल. रसायनांच्या भयानक परिणामांवर तोड अशा वैज्ञानिक प्रगतीने निघेल, जुन्या काळात परत जाऊन नाही.

रसायनांचा असंतुलित व अतिरेकी वापर हा जमिनीकरिता विनाशकारक, शेतकऱ्याला तोटा देणारा आणि ग्राहकालाही अनिष्ट ही गोष्ट खरी; पण याचा अर्थ शेतकऱ्यांनी स्वयंभू किंवा स्वावलंबी खेड्यांमध्ये बिगरव्यापारी शेतीकडे वळायचे आहे, असे नाही.

## इतिहासाच्या निर्णायक पायरीवर शेतकरी

तीन हजार वर्षांपूर्वी शेतीचा शोध लागला; शेतकऱ्यांच्या खळ्यावर धान्याची रास जमू लागली; पोटापाण्याच्या दंडबेड्यांतून मनुष्यप्राण्याची सुटका होईल आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी, 'स्वातंत्र्याच्या कक्षा' विस्तारण्यासाठी तो मोकळा होईल अशी अशा वाटत होती, ती आशा खोटी ठरली. शेतीतील वरकड उत्पन्नाची लूट चालू झाली ती आजतागायत चालू राहिली. लुटारू आले, राजेमहाराजे आले, सावकार, जमीनदार आले, गोरे इंग्रज आले, काळे इंग्रज आले, शेतीची लूट चालू राहिली. शेतीच्या लुटीचे युग संपत आले आहे. मॉस्कोचा पाडाव झाला आहे. नेहरूवाद मिटला आहे. जगभर व्यक्तिगत आर्थिक प्रेरणांचे महत्त्व मानले जात आहे.

सर्वसामान्यांना काही समजत नाही; आम्ही दुढ्ढाचार्य सांगू त्याप्रमाणे त्यांनी करावे; त्यातच त्यांचे कल्याण आहे असे उद्‌घोषणाऱ्या 'प्रेषितां'चा पराभव झाला आहे. नियोजन मंडळात नाही, बाजारपेठेतच सर्वोत्तम निर्णय होतात. छोटी छोटी माणसे आपापल्या कच्च्याबच्च्यांच्याकरिता धडपड करता करता साऱ्या जगाचे कल्याण साधतात. ब्रह्माचे हित आणि पिंडाचे हित एकच आहे, त्यांत तफावत नाही या अद्वैताचा विजय होतो आहे.

हिंदुस्थानातही एक नवा शेतकरी उदयाला येतो आहे. शेती ही त्याची जीवनशैली नाही; त्याचा व्यवसाय आहे. तो केवळ शेतकरी नाही; व्यापारीही नाही; तो सर्वार्थाने उद्योजक आहे. डोळे सताड उघडे ठेवून तो आपली उद्योजकता गाजवणार आहे. रासायनिक शेतीचे त्याला प्रेम नाही. तिला घाबरून धर्मवादी, समाजवादी, पर्यावरणवादी आणि इतर हौसे गवसे नवसे यांच्या कच्छपिला तो जाणार नाही. त्याचा शोध विज्ञानाचा असेल, त्याचे निष्कर्ष प्रयोगाने ठरतील. उद्योजक शेतकऱ्याची शेती विज्ञानशेती असेल. जगभर विज्ञान, विशेषतः जैविकशास्त्रे 'हनुमान झेपा'घेत उंचावत आहे. उद्योजक शेतकऱ्याचा आधार हे विज्ञान आहे. निसर्गशेती, जैविक शेती, पर्यावरण शेती इत्यादी इत्यादी पद्धती विज्ञान स्वीकारतील आणि अर्थकारण मानतील तितक्याच प्रमाणात उद्याच्या उद्योजक शेतकऱ्याला मान्य होतील अन्यथा नाही.

(पूर्वप्रसिद्धी २१ एप्रिल १९९४ पाक्षिक शेतकरी संघटक)

**शरद जोशी**
sharadjoshi.mah@gmail.com

■■

# आमीरचे सेंद्रीय ‘अर्धसत्य’

भाक्रा-नांगल धरणामुळे संपूर्ण पंजाब सिंचनाखाली आला; परंतु पाण्याचा वाजवीपेक्षा अधिक वापर व त्याचे दुष्परिणाम आता दिसू लागले आहेत. शेतांमध्ये सतत ओल राहिल्यामुळे आणि त्यावर पुन्हा पाणी देण्यात आल्यामुळे पंजाबातील जमिनी क्षारपड होऊ लागल्या आहेत. उत्पन्नात हळूहळू घट होत आहे. उत्पन्न वाढीसाठी पुन्हा अधिकाधिक रासायनिक खतांचा वापर असे दुष्टचक्र सुरू झाले आहे. याला कारण हरितक्रांती, रासायनिक खते आणि कीटकनाशके नसून पाण्याप्रमाणेच त्यांचा मुक्त वापर हे आहे.



ज्ञानेश्वर शेलार

कुठलीही नवीन गोष्ट येणार असेल, तंत्रज्ञान येणार असेल, अर्थव्यवस्था, कायद्यात बदल होणार असेल तर त्याला सुरुवातीला कडाडून विरोध करायचा. मोर्चे, धरणे, आंदोलने करायची. अशा नवीन येणाऱ्या गोष्टी छुप्या किंवा उघड मार्गाने रुळल्या की त्याही आपल्या अंगवळणी पडल्या, की त्या मिळाव्यात म्हणून भांडायचे अशी एक मोठी विचित्र भारतीय मानसिकता आहे. याचे कारण कदाचित आपल्या विविधतेतील एकात्मता किंवा पाच हजार वर्षांची उच्च परंपरा, ऋषीमुनींची हजारो वर्षांची तपश्चर्या यातही दडलेले असावे.

स्वातंत्र्यानंतर लगेचच अन्नधान्याचा देशात मोठा तुटवडा निर्माण झाला. इतर देशांवर किंवा ब्रिटिशांवर आपण अवलंबून नाहीत अशी कितीही अलिप्ततावादाची भूमिका घेतली तरी आंतरराष्ट्रीय संबंध अलिप्त ठेवणे त्यावेळीही शक्य नव्हते. रशियन मैत्रीचा सुवर्ण काळ आणि त्याच वेळी उपाशी जनतेला खाऊ घालण्यासाठी अमेरिकेतून लाल गव्हाची आयात अशा विचित्र कोंडीत देश सापडला होता. आपली नेहमीची बैलांनी किंवा हातांनी केलेली शेती वाढत्या लोकसंख्येला खाऊ घालण्यास असमर्थ ठरलेली अशा वेळी मेक्सिकोमध्ये एक चमत्कार घडला. नॉर्मन बोरलॉग या शास्त्रज्ञाने गव्हाच्या अधिक उत्पादन देणाऱ्या व वातावरण आणि कीडीला तोंड देणाऱ्या जातींचा शोध लावला. त्यालाच आपण हायब्रीड बियाणे म्हणतो. या हायब्रीड बियाण्याला पाण्याची शाश्वती व उत्पादन वाढीसाठी बाहेरून रासायनिक खतांचा पुरवठा यांची मात्र आवश्यकता होती. स्वातंत्र्यानंतर लगेच भाकरा-नांगलसारख्या पंजाबातील धरणांच्या पाण्यामुळे आणि गहू हे पीक पंजाब, हरियाणा या प्रदेशातील मुख्य पीक असल्याने हरितक्रांतीची सुरुवात पंजाबातून झाली.

नुकत्याच झालेल्या आमीर खानच्या सत्यमेव जयते या कार्यक्रमात रासायनिक शेती विरुद्ध जैविक शेती असा सामना रंगला, प्रथमतः तर आमीर खानने या कार्यक्रमात ज्या ज्या लोकांना बोलण्याची संधी दिली ते बहुतेक सर्व पर्यावरणवादी किंवा रासायनिक शेतीच्या विरोधातील बोलणारे आणि हे काम गेल्या २०-२५ वर्षांपासून प्रकर्षाने करणारे असे सर्व मुखंड होते. त्यांनी नेहमीप्रमाणेच रासायनिक शेती याचा अर्थ किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतात फवारण्यात येणारी विविध औषधे आणि ती नंतर मानवी शरीरात गेल्यानंतर त्यांची होणारी हानी यांचा परिणाम मोठ्या प्रकर्षाने म्हणण्यापेक्षा ‘अवाच्या सव्वा’ असाच दाखवून दिला आहे. आज तरी यातील खरा दुष्परिणाम हा रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा अतिरिक्त वापर असा आहे. कंपन्यांच्या आकर्षक जाहिराती, शेतकऱ्यांचे अज्ञान किंवा शेतीतील आदानांचा ढोबळ वापर अशामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. अधिक औषधाची मात्रा दिल्यास लवकर कीडीचा प्रादुर्भाव कमी होईल किंवा खतांची अधिक मात्रा दिल्यास उत्पादन वाढेल, असा गैरसमज सर्वत्र आणि विशेषतः शेतकऱ्यांमध्ये हे खरे असले तरी त्यासाठी एकच उदाहरण आपण घेऊया. डॉक्टरकडे गेल्यानंतर डॉक्टर जी औषधे लिहून देतात तीच औषधे आपण घेतो. त्यांनी दिलेली मात्रा व वेळा कटाक्षाने पाळतो. कदाचित त्या हलगर्जीपणा होऊन वेळ चुकणे किंवा कधी कधी औषध न घेणे असे होऊ शकते. बऱ्याचदा पूर्ण औषधे न घेता आपण अर्धीच औषधे विकत घेतो. औषधांचा परिणाम दिसू लागताच. नंतरची अर्धी औषधे आपण घेतच नाहीत. डॉक्टरने दिलेली औषधे लवकर बरे होण्यासाठी कधी कुणी सकाळी एक गोळी आणि संध्याकाळी एक गोळी अशी घ्यायची सांगितली असताना सकाळी दोन गोळ्या आणि संध्याकाळी दोन गोळ्या अशी घेणारा रोगी कदाचित शोधूनही सापडणार नाही. चुकून औषधांची अदलाबदल किंवा चुकून औषध अधिक घेणे असे झाले तरी ते लक्षात आल्यानंतर आपण मोठी काळजी घेतो. शेतीत वापरली जाणारी खते व औषधे तितक्या काळजीने वापरली जात नाहीत. त्यांच्या वापरात ढोबळपणा आहे हे त्यामुळेच म्हणावे लागेल. खते टाकताना पसा, अर्धा पसा इकडे तिकडे किंवा औषधे फवारताना लिटरच्या मापाऐवजी बादल्या डबे वापरणे आणि अंदाजे मोजमाप करणे हे सर्रास चालते. हा काही रासायनिक शेतीचा परिणाम नाही. हा केवळ वापरातील अडाणीपणा, हलगर्जीपणा आहे. यावरून संपूर्ण शेतीच विषबाधीत झाली आहे आणि आता



जर आपल्याला अधिक सुदृढ आणि निरोगी व्हायचे असेल तर केवळ नैसर्गिक शेतीच शिल्लक आहे, असे म्हणणे संयुक्तीक नाही. व्यवहार्य तर अजिबात नाही. हे केवळ रासायनिक खते आणि औषधांच्या बाबतीतच घडलेले आहे असे नाही, धरणांचे मुबलक पाणी पंजाबमध्ये मिळू लागल्यानंतर पंजाब सुजलाम-सुफलाम झाला. सर्वाधिक गव्हाचे एकरी उत्पन्न घेणारे राज्य म्हणून पंजाबला भारताचे गव्हाचे कोठार म्हणून गौरविण्यात आले. या मागे रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा व नवीन बियाण्यांचा वापर याबरोबरच सिंचनाच्या सोयीही असणे आवश्यक आहे. पंजाबमध्ये नेमके हेच घडले. भाक्रा-नांगल धरणामुळे संपूर्ण पंजाब सिंचनाखाली आला; परंतु पाण्याचा वाजवीपेक्षा अधिक वापर व त्याचे दुष्परिणाम आता दिसू लागले आहेत. शेतांमध्ये सतत ओल राहिल्यामुळे आणि त्यावर पुन्हा पाणी देण्यात आल्यामुळे पंजाबातील जमिनी क्षारपड होऊ लागल्या आहेत. उत्पन्नात हळूहळू घट होत आहे. उत्पन्न वाढीसाठी पुन्हा अधिकाधिक रासायनिक खतांचा वापर असे दुष्टचक्र सुरू झाले आहे. याला कारण हरितक्रांती, रासायनिक खते आणि कीटकनाशके नसून पाण्याप्रमाणेच त्यांचा मुक्त वापर हे आहे. आजही ज्या भागात विहीर किंवा कालव्यांनी सिंचन केले जाते त्या ठिकाणीही ही समस्या निर्माण झाली आहे. यावर उपाय म्हणून ठिबक सिंचन, तुषार सिंचन हे आहेत. झाडाला नेमके किती पाणी लागते हे जमिनीचा पोत, पिकाचा प्रकार वातावरण यावरून अगदी प्रत्येक पाण्याच्या पाळीच्या वेळेस ठरवणे आवश्यक आहे. त्या ऐवजी ठरलेल्या दिवशी भुईदांडाने मुबलक पाणी सोडून देणे आणि शेताच्या उताराच्या भागात पाणी आले, की झाले पाणी भरणे असे ढोबळ मोजमाप वर्षानुवर्षे आपण करीत राहिलो. विजेचा आणि पाण्याचाही अपव्यय झाला; परंतु त्यासाठी कुणी आता जर धरणे बांधू नका. कालवे काढू नका, विहिरी खोदू नका, पाणी अडवू नका, असे म्हणू लागले तर हे भूतकाळावर मात करण्याऐवजी स्वतःला भूतकाळात गाडून घेण्यासारखे आहे. त्याऐवजी पाण्याच्या एका एका थेंबाचा उपयोग करणे आणि हिशेब ठेवणे हा उपाय आहे. कीटकनाशकांचा वापर तर अगदी मिली -मिली ग्रॅम असा करणेही धोकादायक आहे. एखाद्या मिलीग्रॅमचा लाखावा भागसुद्धा उपयुक्त ठरू शकतो. नवीन येणारे नॅनो तंत्रज्ञान शेतीतील आदानांचे संगणकीकरण हे आहेत. रासायनिक शेतीला विरोध करणे नव्हे.

आमीर खानच्या संपूर्ण कार्यक्रमात बोलणाऱ्यांनी आपण स्वतःच जैविक शेतीचा अनुभव घेतला आहे आणि तिच्या उत्पादनातून संपूर्ण १२१ कोटींचे भरणपोषण करणे शक्य आहे, असा दावा कुणीही केला नाही फक्त आम्हाला पुरेसे उत्पादन मिळाले एवढाच दावा केला हाही त्यांचा चांगुलपणाच म्हणावा. नसता पर्यावरणवादी आणि निसर्गशेतीवाले हे जणू आम्हालाच सत्य गवसले आहे अशा भ्रमातच सर्रास वावरत असतात.

निसर्ग शेतीकडून कुणी एखादा खरोखर हाडाचा शेतकरी की ज्याचे केवळ शेतीतून उत्पन्न आहे आणि तो आपल्या कुटुंबाचे भागवून विक्रीही करतो आहे, असे कोणीही कार्यक्रमात हजर नव्हते. सरकारने सुरुवातीला मोठी धरणे बांधून खतांवर व कीटकनाशकांवर सबसिडी देऊन तिचा प्रचार केला, गेल्या १० वर्षांपासून मात्र सरकारने आपली भूमिका पूर्णपणे बदलवून टाकली आहे. शेणा-मुताची शेती, गांडूळ शेती, लिंबाच्या पाल्याचा रस फवारणे, गोमुत्र फवारणे, गुळाचे पाणी फवारणे याचा प्रचार संपूर्ण शेतकी खाते व त्यावरील निधी खर्ची घालून प्रचार सुरू केला आहे. हा निधी नेमका अशा आमचे केवळ नैसर्गिक शेतीत भागते, उत्पन्नही चांगले येते, असे सांगणाऱ्या प्रायोगिक तत्त्वावर शेती करणाऱ्या कुठे तरी, अशा सरकारी निधीतील वाटा बरोबर उचलून आपल्या नैसर्गिक शेतीत कसे भरघोस उत्पन्न येते हे दाखवण्यासाठी वापरणाऱ्या किंवा मोठ्या हुद्द्यावरची नोकरी करून नंतरची मिळकत बसून खाण्याइतपत असेल तर मग उद्योग काय करावा म्हणून गच्चीवरची शेती, नैसर्गिक शेती, गांडूळ शेती, गोरक्षण किंवा गाईंची कत्तल थांबवा अशा कार्यक्रमामध्ये खिशाला झळ सोसून केवळ प्रसिद्धी पोटी असे प्रयोग करणाऱ्यांची संख्या यात मोठी आहे. काही स्वयंसेवी संस्थांनी तर सरकारी पैशांवर हात मारून हाच आपला एकमेव उद्योग सुरू केला आहे. अशा एनजीओंची किंवा नैसर्गिक शेती करणाऱ्या




तज्ज्ञांची एखादी तरी दहा-पंधरा एकर शेती नैसर्गिक शेती आहे, असे कुणी दाखवून द्यावे. अशी शेती कोठेही उपलब्ध नाही.

बाजारातही याविषयी नेहमीच गमतीजमती घडतात. भाजी घ्यायला गेल्यानंतर प्रत्येक भाजी विक्रेती महिला, आपण भाजीचा भाव विचारून भाजी न घेता पुढे जाऊ लागलो की, नेहमीचे एक वाक्य गिऱ्हाईकाला आकर्षित करण्यासाठी फेकले जाते. 'कोथंबीर गावरान आहे, भेंडी गावरान आहे, ज्वारी शाळू आहे, अशा प्रकारे बोलले जाते.' खरे तर गेल्या २० वर्षांपासून कुणाच्याच शेतात काहीही गावरान राहिलेले नाही. फक्त विकणाऱ्या बाया गावरान आहेत. घेणाऱ्यांनाही विशेषत: महिला जर असतील तर भाव कमी करणे आणि भाजी गावरान आहे का याची चौकशी करणे यातच स्वारस्य असते. विक्रेतेही त्यामुळे गावरानची जाहिरात करीत असतात.

भरीत भर म्हणून ज्यांनी आंतरजातीय विवाह केला किंवा आंतरधर्मीय विवाह केला अशांचा तात्काळ खातमा करणाऱ्या हरियाणातील 'खाप' पंचायतीने दोन-तीन दिवसांपूर्वीच आपली ही जुलमी प्रतिमा आणि जातीव्यवस्थेची आपल्यावर असलेली घट्ट पकड याचे बीभत्स दर्शन लपवण्यासाठी आम्ही आता पंजाब आणि हरियाणात रासायनिक शेतीचा, रसायनांच्या दुष्परिणामांचा आणि मित्र किडींची वाढ कशी करावी, शेतकऱ्यांना त्यांची ओळख करून देण्याचा कार्यक्रम हाती घेतल्याचे जाहीर केले. ज्यांना कीटकही आपले मित्र वाटतात त्यांना केवळ आपल्या पोटच्या मुलाने आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह केल्यावर त्यांना खतम करताना आपण आपल्या घराण्याच्या, जातीच्या व धर्माच्या इभ्रतीसाठी हे क्रूर कृत्य केले आणि त्याचा अजिबातही पश्चात्ताप वाटत नाही, असे म्हणणे किंवा केव्हा तर असे कृत्य केल्यानंतर स्वत:च पोलिस स्टेशनमध्ये जाऊन हजर होणे, असेही करतात. त्यांना लगेच कीटक कसे काय मित्र वाटू लागले. कीटकांऐवजी आपल्या मुलाबाळांचा विचार त्यांच्या मनात अगोदर येत नाही का? कुठल्याही तात्कालिक लोकप्रिय किंवा ज्यावर लोकांची भावना-मने दुखावली जातील अशा गोष्टींचा फायदा घेण्याचा महाराष्ट्रीयन किंवा मराठी फंडा खाप पंचायतीनेही बिनदिक्कतपणे मित्र किडींच्या प्रचाराने वापरण्यास सुरुवात केली आहे.

नवीन तंत्रज्ञानात शेतीशी नेहमीच दुजाभाव करण्यात आला आहे. मोटारी, इलेक्ट्रॉनिक उपकरणे यामध्ये दररोज नवनवीन विकसित आवृत्त्या येत आहेत. शेतीमध्ये मात्र बीटी कॉटनला याच पर्यावरणवाद्यांनी आणि निसर्ग शेतीवाल्यांनी विरोध केला आहे. आज यातीलच काही संस्था आणि व्यक्ती बीटी कॉटनमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन कसे वाढले आहे आणि त्यांनी वाढलेल्या उत्पादनाचा व त्यातून आलेल्या उत्पन्नाचा वापर आपल्या मुलांना चांगल्या शाळेत टाकणे, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवणे, त्यांच्यासाठी वाहनांची सोय करणे, शेतीची नवीन अवजारे खरेदी करणे, गोठ्यांचे आधुनिकीकरण, शेतात स्लॅपची घरे बांधणे, स्वत:साठी व शेतीमालाच्या वाहतुकीसाठी वाहने खरेदी करणे, पाण्याची बचत करण्यासाठी ठिबकसिंचन, तुषार सिंचनाचा वापर करीत आहेत. असे अभ्यासपूर्ण अहवाल देण्यास सुरुवात केली आहे. भारत कृषक समाज व सामाजिक विकास समिती (नवी दिल्ली) यांनी सादर केलेल्या अहवालात वरील बाबी नमूद केल्या आहेत. बीटी कॉटनमुळे देशातील ९ प्रमुख कापूस उत्पादक राज्यांतल्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सरासरी ३७५ टक्के, तर कपाशीच्या एकूण उत्पादनात ४.९५ टक्के वाढ झाल्याचे नमूद केले आहे. याच संस्था, संघटना पर्यावरणवादी व निसर्गशेतीवाले सध्या बीटी वांग्याबद्दल मात्र अवाक्षरही काढण्यास तयार नाहीत. रासायनिक शेतीवर पर्याय म्हणून जीएम (जेनेटीकली मॉडीफाईड) म्हणजे जैवतंत्रज्ञानाने तयार झालेले बियाणे ज्यामध्ये विविध रोगांना प्रतिबंध करणारी जीन्स (गुणसूत्रे) टाकण्यात येतात. बीटी कॉटनप्रमाणेच वांगेही उत्पादित करणे जगभर सुरू झाले आहे. एकीकडे रासायनिक शेतीला विरोध करतानाच दुसरीकडे जीएम बियाण्यांनाही याच लोकांचा विरोध चालू आहे. आता पाठीमागे जाणे शक्य नाही; पण जीएम बियाणे स्वीकारून आपण रासायनिक शेतीला आळा घालू शकतो; परंतु ही दुटप्पी भूमिका सर्वांच्या लक्षात यायला हवी. आमीर खाननेही या जीएम बियाण्यांचा, बीटी कॉटनचा, बीटी वांग्याचा उल्लेख केला नाही त्यातील तज्ज्ञांनाही कार्यक्रमात बोलावले नाही. यापेक्षाही अधिक पुढे जायचे म्हटले तर एखादी वनस्पती वाढण्यासाठी सुर्यप्रकाश, पाणी, माती, हवा इत्यादींची आवश्यकता असते. हरितगृहामध्ये पाणी आणि सुर्यप्रकाश तसेच हवेचे नियंत्रण करता येते. मातीची तर अजिबात गरज नाही. भुसा, नारळाच्या शेंड्या यांच्या आच्छादनावरसुद्धा योग्य तऱ्हेने खतमीश्रित पाण्याचा शिडकावा केल्यास वनस्पतींची वाढ अत्यंत जोमाने होते. अगदीच कुठलाही पदार्थ मुळाशी न ठेवता हवेत तरंगणारी मुळे ठेवून त्यांच्यावर तुषारांचा वर्षाव केल्यास व काही काळ पाण्यात बुडवून ठेवल्यास वनस्पती वाढतात. यालाच एरोपॉनिक्स म्हणजे हवेतील शेती असे म्हणतात. ही शेती कदाचित पर्यावरणवादी आणि निसर्गशेतीवाल्यांच्या अजून गावीही नसावी. यदाकदाचित मातीशिवाय शेती जर आली तर हेच लोक भारतीय संस्कृतीत असा राक्षसी प्रयोग बसतो काय? म्हणून पुन्हा विरोधही करतील? आमीर खानने आपल्या कार्यक्रमात जीएम बियाण्यांचा एरोपॉनिक्स फार्मिंगचा, हरितगृहातील शेतीचा, कोठेही उल्लेख केलेला नाही. उद्याची शेती तीच आहे, आता एवढेच म्हणावे लागेल. आमीर खानने सत्यमेव जयतेमधून फक्त 'अर्धसत्य' सांगितले.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# ‘सत्यमेव जयते’च्या डोळ्यांतले मूसळ

कीटकनाशकांच्या नावाने ओरड करणारे हेच शहरी लोक जीएम तंत्रज्ञानाच्याही विरोधात आहेत. जीएम तंत्रज्ञानामुळे कीटकनाशकांचा वापर लक्षणीयरीत्या कमी झाला ही गोष्ट समोर ठेवून त्यांनी निदान जीएम तंत्रज्ञानाचा तरी पुरस्कार करायला हवा; पण दुटप्पीपणे वागणारे हे शहरी लोक एकाच वेळेस कीटकनाशकांचा आणि जीएम तंत्रज्ञानाचा विरोध करतात. यांच्या विरोधामागे खरे कारण काय आहे? याचा शोध घेण्याची वेळ नक्कीच आली आहे. आरोग्यविषयक किंवा समाजसुधारणाविषयक मुद्द्यांवर चर्चा करताना ही शहरी माध्यमे विविध स्वयंसेवी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या तालावर नाचताना दिसतात. या स्वयंसेवी संस्था कोणाच्या आर्थिक मदतीवर चालतात याचा शोध घेतल्यास बरीचशी बिंगे फुटू शकतात. देणग्यांच्या माध्यमातून लाखो डॉलर्सची संपत्ती जमा करणाऱ्या या स्वयंसेवी संस्थांच्या हेतूबद्दल शंका घ्यायलाच पाहिजे.



**श्रीकृष्ण उमरीकर**

आजचा समाज माध्यमांच्या प्रभावाखाली पुरता दबून गेलेला आहे. या माध्यमांमध्ये मुख्यकरून दूरदर्शन वाहिन्या, गल्ला भरू चित्रपट आणि उथळ बातम्या छापणारे वर्तमान पत्र यांचा समावेश होतो. यांसारख्या माध्यमांतून चघळायला लोकांना विषय मिळतो आणि सामाजिक समस्यांची आपल्याला जाण आहे, काळजी आहे असा आव आणता येतो. एवढीच या माध्यमांची उपयुक्तता आहे. समाजातील प्रश्न कोणते, ते का उभे राहिले, त्याची सोडवणूक करण्याची मार्ग कोणते याचा सखोल अभ्यास, चर्चा आणि प्रत्यक्ष कृती करण्यामध्ये कोणालाच रस नाही आणि म्हणून समाजाची आजची ही खालावलेली स्थिती झाली आहे. याचा दोष खरे तर व्यक्तीकेंद्रीत स्वार्थी झालेल्या समाजाचाच आहे. एकटा-दुकटा कार्यक्रम एखादी वाहिनी किंवा एखाद्या वाहिनीवरील कलाकार यांनाच दोष देणे बरोबर होणार नाही; पण वरील मुद्दा स्पष्ट करण्यासाठी एखाद्या कार्यक्रमाला समोर ठेवूनच चर्चा करावी लागेल.

टीव्हीवर लोकप्रिय झालेला कार्यक्रम ‘सत्यमेव जयते’ची चर्चा सर्वत्र सुरू आहे. सामाजिक परिस्थिती फार बिघडत आहे म्हणून मोठ्याने गळे काढणाऱ्या आणि खूर्चीतच बसून आपले कार्य करणाऱ्या समाजातील फार मोठ्या वर्गाला या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्या ‘सामाजिक जाणीवांची’ नव्याने ओळख व्हायला लागली आहे. आणि लोकप्रिय चिटपट कलाकार आमीर खान याने स्वत:ची एक संवेदनशील कलाकार म्हणून जी प्रतिमा उभी केली आहे तिचा फायदा या कार्यक्रमाच्या दर्शकांना आणि कार्यक्रमाची लोकप्रियता वाढविण्यासाठीच होत आहे.

नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात त्यांनी कीटकनाशकांच्या वापराबद्दल चर्चा केली आणि कीटकनाशक हे आरोग्यास अत्यंत धोकादायक असून सेंद्रीय किंवा निसर्गशेतीचा अवलंब करावा असा अनाहूत सल्लाही देऊन टाकला. खरे तर कीटकनाशक हे विषारी असतात ही गोष्ट कीटकनाशकांच्या बाटल्या पिऊन आत्महत्या करणाऱ्या शेतकरी समाजाला नव्याने सांगण्याची गरज नाही. अत्यंत काळजीपूर्वक जोपासलेले भरातले पीक खायला जेव्हा अळ्या आणि कीडे येतात तेव्हा त्यांना हे प्रेमाने सांगून होत नाही की, ‘बाबांनो हे पीक मी अत्यंत कष्टाने पिकवले आहे त्यासाठी मी माझ्याकडचा असलेला सगळा पैसा खर्च केला आहे आणि कापणीनंतर हे पीक विकून जे काही दोन पैसे हातात पडतील, त्यावरच मला उद्याची भाकरी मिळणार आहे, मी पोराला शिकवणार आहे. पोरीचं लगीन करणार आहे. जमलंच तर घरावरची गळणारी दोन पत्रेही बदलणार आहे. म्हणून तुम्ही कृपा करून माझ्या पिकाची नासाडी करू नका.’ असा भावूकपणा शेतकऱ्याला करणे शक्य नाही. त्यामुळे किडींचा-अळ्यांचा प्रादूर्भाव होताच. त्यांचा नायनाट करण्यासाठी योग्य ते कीटकनाशक वेळीच फवारणे हा पीक वाचवण्याचा एकमेव उपाय असतो. निसर्गाचा समतोल ढासळवण्यासाठी किंवा मानवजातीला कॅन्सर व्हावा म्हणून किंवा जमिनीखालचे पाणी किंवा माती दुषित व्हावी म्हणून कोणी शेतकरी आपल्या शेतात कीटकनाशके फवारत नाही. आणि खरे पाहिले तर आपल्या घरात डास येऊ नये म्हणून मॉस्किटो रिपेलंट वापरणारे आपल्या कपड्या-पुस्तकांना कसर लागू नये म्हणून डांबराच्या गोळ्या किंवा इतर सुगंधी वड्या वापरणारे किंवा दिवसभराच्या धावपळीत आपल्या अंगाला घामाची दुर्गंधी येऊ नये म्हणून ‘डीओडीरन्ट’ वापरणाऱ्या या तथाकथीत समाजसुधारणेची काळजी वाहणाऱ्या शहरी समाजाला ज्याचे माध्यमांमध्ये वर्चस्व आहे आणि ज्याच्याचसाठी माध्यमे नाचत असतात त्याला शेतकऱ्यांवर टीका करण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही हे नक्की.

खरे पाहिले तर एकात्मिक कीडव्यवस्थापन ‘इंटीग्रेटेड पेस्ट मॅनेजमेंट’द्वारे बऱ्याच किडींवर नियंत्रण मिळवता येते; पण हा उपाय नेहमीच यशस्वी ठरेल असे नाही. त्याचसोबत एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी मनुष्यबळाची गरज पडते. शेतीतली नेहमीची कामे करण्यासाठीच मजूर मिळणे दुरापास्त झाले असताना ही अशी माणसांकरवी करून घेण्याची कामे अंगावर ओढून घेणे म्हणजे शेतकऱ्याने आपल्या पायावर धोंडा पाडून घेणेच होय. त्यामुळे कीडींवर नियंत्रण मिळवण्यासाठी सद्य परिस्थितीमध्ये कीटकनाशके फवारणे हाच उपाय करण्याजोगा आहे. परदेशात जेथे हजारो एकरांची शेती होते. तेथे विमानाने औषधींची तथा कीटकनाशकांची फवारणी करण्यात येते. त्याचा परिणाम अर्थातच वातावरणावर होतो आणि कीटकनाशकांची मात्राही जास्त लागते. नागरिकांच्या आरोग्याबाबत अमेरिका तथा युरोपातील सरकारे जास्त जागरूक असल्यामुळे या गोष्टीकडे तेथे जास्त गंभीरपणे पाहिले जाते आणि म्हणून कीटकनाशकांमुळे होणारे प्रदुषण (हवेचे, मातीचे किंवा पाण्याचे) याबाबतीत तेथे जास्त संवेदनशीलता आढळते आणि म्हणून अमेरिकेत किंवा युरोपात सेंद्रीय पद्धतीने पिकवलेल्या अन्न-धान्य आणि फळे यांना मोठी बाजारपेठ मिळत आहे; पण त्याचसोबत सेंद्रीय पद्धतीने केलेली शेती शेतकऱ्यास फायदेशीर राहील हे मात्र निश्चितच बघण्यात येते.

या उलट आपल्या देशात कीटकनाशकांचा वापर मर्यादीत प्रमाणात होतो. आपली फवारणी छोट्या यंत्राद्वारे होत असल्यामुळे हवेला त्या मानाने कमी धोका संभवतो. आरोग्यास धोका असलाच तर तो फवारणी करणाऱ्या



**आज जेव्हा सरकार चुकीच्या धोरणांचा अवलंब करून शहरी मध्यमवर्गाला स्वस्तात अन्नधान्य कापडचोपड उपलब्ध करून देण्यासाठी शेतकऱ्यांची लूट करत आहे. शेतीमालाचे भाव जाणीवपूर्वक पाडत आहे आणि म्हणून या तोट्याच्या शेतीतून शेतकरी आत्महत्या करून किंवा आपली जमीन विकून बाहेर पडताना दिसतो आहे. परिस्थितीपुढे हतबल असलेल्या अस्मानी-सुलतानी दोघांचाही मार खाणाऱ्या शेतकऱ्याला सल्ला देणे सोपे आहे; पण माध्यमांतील बोलभांडांनी सेंद्रीय पद्धतीने फायदेशीर शेती खरेच करून दाखवावी. सेंद्रीय शेतीतून दोन पैसे मिळत असले तर हा शेतकरी आनंदाने सेंद्रीय शेतीचा मार्ग अवलंबेल.**

मजुराच्या आरोग्यालाच आहे. कारण फवारणी करताना चेहऱ्यावर मास्क वगैरे न लावता सर्रास फवारणी करण्यात येते. बरीचशी कीटकनाशके तथा खते ही ऊन-पाण्याच्या संपर्कात येऊन काही काळाने प्रभावक्षीण होतात आणि मातीत, हवेत विरून जातात. त्यांच्या दुष्परिणामांबद्दल जास्त काळजी करण्याची गरज नाही.

कीटकनाशकांच्या नावाने ओरड करणारे हेच शहरी लोक जीएम तंत्रज्ञानाच्याही विरोधात आहेत. जीएम तंत्रज्ञानामुळे कीटकनाशकांचा वापर लक्षणीयरीत्या कमी झाला ही गोष्ट समोर ठेवून त्यांनी निदान जीएम तंत्रज्ञानाचा तरी पुरस्कार करायला हवा; पण दुटप्पीपणे वागणारे हे शहरी लोक एकाच वेळेस कीटकनाशकांचा आणि जीएम तंत्रज्ञानाचा विरोध करतात. यांच्या विरोधामागे खरे कारण काय आहे? याचा शोध घेण्याची वेळ नक्कीच आली आहे. आरोग्यविषयक किंवा समाजसुधारणाविषयक मुद्द्यांवर चर्चा करताना ही शहरी माध्यमे विविध स्वयंसेवी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या तालावर नाचताना दिसतात. या स्वयंसेवी संस्था कोणाच्या आर्थिक मदतीवर चालतात याचा शोध घेतल्यास बरीचशी बिंगे फुटू शकतात. देणग्यांच्या माध्यमातून लाखो डॉलर्सची संपत्ती जमा करणाऱ्या या स्वयंसेवी संस्थांच्या हेतूबद्दल शंका घ्यायलाच पाहिजे.

याच कार्यक्रमात शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेतीकडे वळावे असा सल्ला दिल्या गेला; परंतु वर म्हटल्याप्रमाणे हा केवळ फुकटचा सल्ला होता. कोणत्याही आमीर खानने किंवा स्वयंसेवी संघटनेने एक-दोन एकरांत का होईना फायद्याची सेंद्रीय शेती करून दाखवलेली नाही. जर सेंद्रीय शेती खरेच फायद्याची असेल तर त्याकडे वळण्यास शेतकऱ्यांचा कोणताही विरोध असणार नाही. सेंद्रीय पद्धतीने केलेल्या शेतीतून पुरेसे अन्न निर्माण होत नव्हते म्हणूनच देशाची उपासमार होत होती आणि हरितक्रांतीची गरज निर्माण झाली होती. त्या काळात देशाला धान्याची आयातही करावी लागली होती. हरितक्रांतीनंतर ही आयात थांबलीच आणि धान्याचे उत्पादन एवढे वाढले की, आज आम्ही माजल्यासारखे लाखो टन धान्य सडवत आहोत. खतांच्या अतिरिक्त तथा अतिरेकी आणि चुकीच्या वापरामुळे जमिनीचा पोत बिघडला हे जरी खरे असले तरीही १९७० नंतर आजपर्यंत भारतातील शेतकऱ्याला शेती करण्यासाठी प्रवृत्त करण्यास हीच हरितक्रांती आणि खतांचा वापर कारणीभूत होता हेही खरेच आहे. आज जेव्हा सरकार चुकीच्या धोरणांचा अवलंब करून शहरी मध्यमवर्गाला स्वस्तात अन्नधान्य कापडचोपड उपलब्ध करून देण्यासाठी शेतकऱ्यांची लूट करत आहे. शेतीमालाचे भाव जाणीवपूर्वक पाडत आहे आणि म्हणून या तोट्याच्या शेतीतून शेतकरी आत्महत्या करून किंवा आपली जमीन विकून बाहेर पडताना दिसतो आहे. परिस्थितीपुढे हतबल असलेल्या अस्मानी-सुलतानी दोघांचाही मार खाणाऱ्या शेतकऱ्याला सल्ला देणे सोपे आहे; पण माध्यमांतील बोलभांडांनी सेंद्रीय पद्धतीने फायदेशीर शेती खरेच करून दाखवावी. सेंद्रीय शेतीतून दोन पैसे मिळत असले तर हा शेतकरी आनंदाने सेंद्रीय शेतीचा मार्ग अवलंबेल.

दुसऱ्याच्या डोळ्यांतले कुसळ दिसते; पण आपल्या डोळ्यांतले मुसळ दिसत नाही, ही म्हण सदर कार्यक्रमाने आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल शहरी जनतेमध्ये असलेल्या अज्ञानाने पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. शहरातून गाड्या तथा कपडे धुण्यासाठी जेवढे पाणी वापरल्या जाते, तेवढे पाणी खेड्यातील घरांना कित्येक महिन्यांतसुद्धा मिळत नाही. छोट्या मोठ्या कामांसाठी, जवळचे अंतर कापण्यासाठी दुचाकीवर टांग मारून जाणाऱ्या आणि हवेचे प्रदुषण करणाऱ्या शहरी मध्यमवर्गाला शेतकऱ्याला अनाहूत सल्ला द्यायचा कोणताही अधिकार नाही. विजेचा प्रचंड गैरवापर करणाऱ्या शहरी माध्यमवर्गाने जन्मोजन्म अंधारात खितपत पडलेल्या शेतकऱ्याच्या डोळ्यांतल्या कुसळाची चर्चा न करता आपल्या डोळ्यांतले मुसळ दूर करावे हेच बरे.

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानल पेठ, परभणी-४३१४०१. मो. ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com

# छे छे हा घातपात नव्हताच!

नका हो, नका आमच्याकडे अशा संशयी नजरेने बघू. नका, नका अशा वटारलेल्या डोळ्यांनी आमच्याकडे बघू नका! आम्ही सांगतो, अगदी खरं सांगतो, देवा शपथ सांगतो, एवढे कशाला आम्हाला सर्वांत प्रिय, अर्थात दर्शनी का असेना; पण सर्वांत प्रिय सोनिया-पवारची शपथ घेऊन सांगतो की जे काही घडलं त्यात आमचा काही हात नव्हता. तो केवळ अपघात आणि अपघातच होता. तुम्हीच सांगा, ज्या इमारतीत आम्ही काम करतो म्हणजे आम्ही करतो असं समजलं जातं, त्या ठिकाणाला आम्ही कशी काय आग लावणार बरं? म्हणजे ज्या ठिकाणाहून आम्ही पिढ्यानुपिढ्यांची बेगमी करतो त्या ठिकाणाला आम्ही आग लावू हे संभवतं कसं? सॉरी हं, ते शेवटचं वाक्य आहे ना, 'ज्या ठिकाणाहून आम्ही पिढ्यानुपिढ्यांची बेगमी करतो' हे वाक्य आम्ही बोललो हे विसरून जा. सवयीप्रमाणे नंतर आम्ही आमच्या श्रेष्ठींनी विचारलं तर सांगणार आहोत की, आम्ही असं म्हणालोच नव्हतो, तर मीडियानं आमच्या म्हणण्याचा चूक अर्थ लावला.

मुद्दा हा की आम्ही कितीही पोटतिडकीने बोललो तरी तुम्ही आमच्या सांगण्यावरच नव्हे तर एकूणच आमच्यावर विश्वास ठेवणार नाही हे आम्हाला माहीत आहे. तरीही फॉर द सेक ऑफ रेकॉर्ड आम्ही आमचं म्हणणं असं मांडणार आणि ठासून सांगणार की जे घडलं त्याबाबत आमचा काहीही संबंध नाही. शेवटी प्रश्न विश्वासाचा आहे आणि विश्वास तरी काय? सापेक्षच असतो ना. म्हणजे आम्ही साधी माणसं अविश्वसनीय आहोत, भ्रष्ट आहोत असे म्हणणारे तुम्ही किती आहात? अण्णा, बाबा, मीडियावाले काही आणि ज्यांना आमची भरभराट सहन होत नाही असे तथाकथीत 'नीतिमत्ता' ब्रिगेडवाले मूठभर; पण प्रत्यक्षात मेजॉरिटी तर आम्हाला निवडून देते म्हणजे बहुमताचा विश्वास तर आमच्या बाजूनेच आहे ना! मग तुमच्या आमच्यावर विश्वास न ठेवण्याला विचारतो कोण? म्हणून म्हणतो तुम्हीसुद्धा आमच्या सांगण्यावर विश्वास ठेवा की जे काही घडलं त्यात आमचा काहीही संबंध नाही. जे घडलं तो केवळ अपघातच होता.

आता प्रश्न आहे तो हा की, आमच्या 'टग्या दादा'ने 'बाबा'ची चेंबर कशी सुरक्षीत राहिली या त्यांच्या बोलण्याचा. पण काही झालं तरी तो आमचा अंतर्गत प्रश्न आहे. शिवाय 'टग्या'च्या त्या स्टेटमेंटचा आपण चूक अर्थ लावत आहात. 'टग्या'चा उद्देश काही वेगळा नव्हता. त्यांचा देवावर विश्वास आहे आणि त्यांनी दैवी घटनेबाबत आपल्या निष्ठा व्यक्त करणारे काही उद्गार काढले, त्यामागे त्यांचा उद्देश केवळ एवढाच होता की, आमच्या 'घड्याळा'वर जो अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणाचा आरोप केला जातो तो खोडून काढण्यासाठी 'टग्या'ने या निमित्ताने परमेश्वरी करणीवर आपली श्रद्धा व्यक्त करून हिंदू मतांना चुचकारण्याचाच एक प्रयत्न केला आहे एवढंच. शिवाय आमच्या 'घड्याळ' महर्षींनी त्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. म्हणजे काय ते मात्र आम्हाला विचारू नका. आम्हा सामान्य कार्यकर्त्यांना श्रेष्ठींच्या 'आतून कीर्तन वरतून तमाशा' छाप स्पष्टीकरणाचा अर्थ कळत नाही. आम्ही आपले आपापला 'अर्थ' साधण्यापूरता त्यांच्या मागे राहतो एवढंच. आमचा 'अर्थ' नाही साधला तर आम्ही तरी त्यांच्यावर कसा काय विश्वास ठेवणार?

खरं सांगायचं तर घडला प्रकार घातपात आहे असं तुम्हा पब्लिकला वाटतं त्याचं कारण म्हणजे या घटनेचं 'टाईमिंग'. या घटनेचं टाईमिंग असं काही आहे की तुम्हाला काय; पण आम्हालाही शंका वाटते आहे. पण आम्हाला शंका घेऊन चालणा नाही, कारण श्रेष्ठींच्या 'अर्थकारणाच्या' पिकातले काही दाणे आमच्याही पदरात पडलेले असतात आणि पुढेही पडणार असतात; पण हे झालं थोडंसं विषयांतर तर आम्ही बोलत होतो ते 'टाईमिंग'बद्दल. त्याचं काय आहे की नेमकं याचवेळेस अण्णांचं लोकपाल बिल आणि भ्रष्टाचारविरोधी आंदोलन तसंच बाबांचं काळा पैसा आणि परदेशी लपवलेला पैसा या विरुद्धचं आंदोलन जोर धरून आहे. नेमकं याच वेळेस 'आदर्श'नं आमचा घाम गाळला आहे. त्यामुळे आमच्यातल्या 'हाता'ला कंप सुटलाय तर 'घड्याळा'ला उकळ्या फुटताहेत. म्हणून नेमकं 'हाता'नं 'घड्याळा'च्या 'तटकरी' काट्याला धक्का मारून त्यांच्या शेकडो नव्हे तर हजारो एकर जमिनीची आणि शेकडो कंपन्यांची घपला घपली बाहेर आणण्याची व्यवस्था केली; पण अशी व्यवस्था करणारे आम्ही आणि आरोपाचा निरानिपटारा करायची व्यवस्थाही करणारे आम्हीच. त्या 'आदर्श'चंच उदाहरण बघा ना, आम्ही आधीपासून म्हणत नव्हतो का की आदर्शमध्ये काही गडबड सारं कसं 'आलबेल' आहे म्हणून. आणि आता आमचं म्हणणं सिद्ध झालंय. ती जमीन सरकारचीच होती असा निर्णय आणण्याची व्यवस्था आम्ही केली आणि ती यशस्वीरीत्या पार पाडली आहे. आता सारी जबाबदारी कुणावर टाकावी याच्यासाठी चक्रव्यूह तयार केला आहे. पूर्वी पोरं एक खेळ खेळायचे. चार कोपऱ्यात चौघांनी उभं राहायचं आणि पाचव्यानं प्रत्येकापुढे उभे राहून म्हणायचं 'आई मला पुरी दे' आणि त्या कोपऱ्यातल्या माणसानं म्हणायचं 'जा त्या घरी' आणि त्या माणसानं पुढच्या कोपऱ्यात जाऊन त्याला म्हणायचं 'आई मला पुरी दे.' या फिरवा फिरवीत कोपऱ्यातल्या लोकांनी मागणाऱ्याची नजर चुकवून आपले कोपरे बदलायचे. हा खेळ चालत राहतो; पण मागणाऱ्याला पुरी काही मिळत नाही. इथेही तेच चाललं आहे. आमचा एक माजी मु.मं. दुसऱ्या माजी मु.मं.ला आणि दुसरा तिसऱ्याला मात्र आता तिसऱ्यापुढे कुणी माजी मु.मं. उरला नाही म्हणून हाताखालच्या सचिवावर जबाबदारी ढकलतो आहे. तेव्हा यातून काहीच निष्पन्न होणार नाही. हे तुम्हाला माहीत आहे आणि आम्हालाही. मग आम्ही आग कशाला लावू बरं? हां, मात्र एक अडचण आहे. आम्ही केवळ सह्या केल्या, खरी शिफारस सचिवांनी केली हे दाखवणारी कागदपत्रं मात्र जळून गेली असावीत असं आम्हाला वाटतं आणि तुम्हालाही वाटत असावं. नेमकं यावेळेसच आदर्शची चौकशी चालू असल्यामुळे 'टाईमिंग' चुकलं आणि शंकेला बळ आलं एवढंच. बाकी त्यात आमचा काहीही हात नाही.

आणि हो आणखी एक शंकेला जागा म्हणजे आम्ही आमच्या काळात केलेल्या 'भूदाना'ची प्रकरणं आणि महसूलातली वाटावाटीची प्रकरणं. तुम्हा लोकांना शंका वाटत असेल की महसूलातल्या फायलीतल्या पोतडीतून आणखी काय काय बाहेर येऊ शकेल. या आशंकेनं आम्हीच ही कागदपत्रं जाळून टाकली की काय? हे बघा, आमचे दामन साफ आहेत. आम्ही जे 'भूदान' केलं ते फार मोठं ध्येय पुढे ठेवून या देशाला विद्यासंपन्न करावं म्हणून आम्ही अनेक संस्थांना हे भूदान केलं, ज्या योगे शिक्षणसंस्थाने 'निर्माण करण्याची सोय होऊ शकली. आमच्या 'घड्याळ सम्राटांनी' म्हणल्याप्रमाणे शिक्षण संस्थांना 'भूदान' करण्याचं पवित्र कामच करण्यात कसला आला आहे वाईट हेतू? आणि तुम्हीच सांगा आता शिक्षणसंस्थानं निर्माण करायची झाली तर त्यात पैसा ओतायला संस्थानिक नकोत का? आणि अशी 'शक्ती' असणारे पोलादी 'अर्थ' पुरुष फक्त आमच्यातच आहेत. त्यामुळे या भूदानाचे पात्र भिक्षूक अर्थात आम्हीच आणि केवळ आम्हीच असू शकतो हे उघडच आहे. मग अशा उघड पारदर्शी व्यवहाराची कागदं जाळण्यासाठी आम्हाला काय बरं आवश्यकता असणार? जे झालंय जे घडणार याची सारी जाणीव तुम्हा पब्लिकला आहेच तेव्हा तुमच्या साक्षीनेच आमचे सारे 'धंदे' - आय मीन आमचे व्यवहार - चालतात. तेव्हा व्यवहार कळू नयेत म्हणून कागद जाळावे लागतात हा केवळ भ्रम आहे. आम्ही जे काही करतो ते डंके की चोट पर.

तेव्हा लोकहो, खरंच सांगतो, शपथ घेऊन सांगतो, अगदी सोनिया-पवारची शपथ घेऊन सांगतो जे घडलं त्याच्याशी आमचा काही संबंध नाही.

■■

# म्हातारी काँग्रेस, पोरकट भाजप आणि भाबडी जनता



सुधाकर जाधव

राष्ट्रपती पदासाठी उमेदवार निवडताना राजकीय पक्षांचा उडालेला गोंधळ आणि गोंधळ घालण्यात झालेली त्याची परिणती बघितली की दोन प्रश्न पडतात. पहिला प्रश्न पडतो तो लोकशाहीमध्ये आवश्यक असलेला संवाद साधण्याची मूलभूत बाब सारेच राजकीय पक्ष विसरत चालले आहेत का? दुसरा प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे आणि तो म्हणजे सव्वाशे कोटींच्या देशात चटकन नजरेत भरेल आणि सर्वसंमती होईल अशी एकही योग्य व्यक्ती नाही का? गेल्या दोन वर्षांत देशाच्या राजकीय पटलावर जो गोंधळ सुरू आहे ते लक्षात घेता पहिल्या प्रश्नाचे उत्तर काय आहे ते राजकीय समज नसलेल्यांनाही कळायला अवघड नाही. संवादाची कला सर्वच राजकीय पक्ष विसरत चालले आहेत याबाबत दुमत होण्यासारखी परिस्थिती नाही. देशातील प्रमुख राजकीय पक्ष म्हणून आणि सत्ताधारी पक्ष म्हणूनदेखील अशा संवादात पुढाकार घेण्याची जबाबदारी काँग्रेस पक्षाची आणि त्याला प्रतिसाद देण्याची जबाबदारी प्रमुख विरोधी पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षावर येते; पण राष्ट्रपती पदाच्या बाबतीतच नव्हे तर देशासमोरील कोणत्याच प्रश्नाच्या बाबतीत ही जबाबदारी या दोन्ही पक्षांनी पार पाडलेली नाही. इतर पक्ष आपापल्या सोयीनुसार राजकीय विसंवादाच्या या प्रक्रियेत सामील होत आले आहेत. देशाच्या सर्वोच्च पदावर बसण्यासाठी एकही सर्वसंमत लायक व्यक्ती नाही असे म्हणणे यासाठी संयुक्तिक होणार नाही की त्या पदावर कसा व्यक्ती असला पाहिजे याबाबत इतक्या वर्षानंतर ही राजकीय व बिगर राजकीय वर्तुळात स्पष्टता नाही. ही स्पष्टता नसल्याने अशी व्यक्ती शोधताना अपरिहार्यपणे योग्यतेऐवजी सोयीवर भर दिल्या जातो. आज यापेक्षा वेगळे काही घडलेले नाही; पण या निमित्ताने सत्ताधारी पक्षातील असमंजसपणाची स्थिती व योग्य निर्णय घेण्याची प्रकट झालेली अक्षमता आणि प्रमुख विरोधी पक्षाने दाखविलेला बालीशपणा हा राष्ट्रपती पदासाठी उमेदवाराच्या निवडीपेक्षाही जास्त चिंतेचा विषय आहे.

### काँग्रेसने संधी गमावली

गेल्या वर्ष-दोन वर्षांपासून काँग्रेस पक्ष आणि केंद्रातील काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार जनतेच्या रोषास पात्र ठरले आहे. पक्षावर आणि सरकारवर चौफेर हल्ले होत आहेत. या हल्ल्यांना तोंड देण्याचे धैर्य ना पक्ष नेतृत्वाने दाखविले आहे ना सरकारचे नेतृत्व करणाऱ्यांनी दाखविले आहे. पक्ष आणि सरकारचे नेतृत्व हल्ल्याने भांबावून खंदकात जावून बसले. पक्ष किंवा सरकारातील दुसऱ्या फळीतील दिग्विजयसिंह, कपील सिब्बल किंवा पक्ष प्रवक्त्यांनी होणाऱ्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी जेव्हा जेव्हा तोंड उघडले तेव्हा तेव्हा त्यांनी पक्षाला व सरकारला तोंडघशीच पाडले. राजकारणात आरोप-प्रत्यारोप काही नवीन नाहीत. राजकीय आरोप म्हणजे खऱ्या-खोट्याचे बेमालूम मिश्रण असते आणि तेवढ्याच खऱ्या-खोट्या माहितीच्या आधारे प्रत्युत्तर देण्याची परंपरा आहे. या प्रकाराला जनताही कधी मनोरंजना पलीकडे महत्त्व देत नाही; पण सरकारवर झालेले आरोप महाभ्रष्टाचाराचे होते आणि या आरोपांना पक्ष व सरकारच्या नेत्यांनी महामौनाने त्याचे उत्तर दिले. परिणामी जनमानसात काँग्रेस म्हणजे भ्रष्टाचाराने बरबटलेला पक्ष आणि सरकारातील लोक भ्रष्टाचारा शिवाय दुसरे काहीच करीत नाहीत हा समज दृढ होत गेला. सरकारची प्रत्येक कृती लोकांच्या विशेषत: संख्या आणि ताकद या दोहोंनी वाढत चाललेल्या मध्यमवर्गीयांच्या दृष्टीने संशयाच्या भोवऱ्यात यायला लागली. याच्या परिणामी शासन आणि प्रशासन निष्क्रिय होत गेले. कसा बसा एखादा निर्णय घेतला आणि त्यावर हल्ला झाला की सरकार शेपूट घालू लागले. स्पेक्ट्रमसंबंधी असो की कोळशासंबंधी असो सरकारच्या सर्वच धोरणात्मक निर्णयालाच सर्वत्र भ्रष्टाचार म्हणून समजल्या गेल्यानंतरही पक्ष व सरकारचे महामौन सुटले नाही. धोरणविषयक निर्णयाचे समर्थन करण्याऐवजी सरकारने धोरणविषयक निर्णयच घेणे बंद केले. जगभरची अर्थव्यवस्था मंदीच्या संकटात सापडली असल्याने अतिशय दक्ष राहून कठोर निर्णय घेण्याची गरज असताना सरकार हातपाय गाळून बसल्याने देशातील अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला. सरकारचे सल्लागारदेखील सरकारला धोरण लकवा झाल्याचे खुलेआम मान्य करू लागलेत. कधी नव्हे ते सारे उद्योग, व्यापार आणि कृषी जगत सरकारच्या धोरणविषयक लकव्यावर प्रहार करू लागलेत. या सर्व प्रकाराला मनमोहनसिंह यांचे दुबळे आणि मुखदुर्बळ नेतृत्व कारणीभूत असण्यावर जवळपास देशभरात एकमत आहे. आज देश अनेक बाबतीत अनेक प्रश्नांवर विभागला आहे. राजकीय आणि आर्थिक पंडितांचे एकमत होणे ही दुर्मिळ गोष्ट मानली जाते; पण मनमोहनसिंह यांच्या दुबळ्या नेतृत्वावर आज या सर्वांचे एकमत आहे. सरकारचा चेहरामोहरा बदलला नाही तर पुढच्या निवडणुकीत काँग्रेसला भवितव्य नाही याबाबत राजकीय वर्तुळात दुमत नाही. उत्तर प्रदेशात गांधी कुटुंबाच्या परंपरागत मतदार संघातील निवडणूक कौलाने याची पुष्टीच केली आहे; पण सरकारच्या बाबतीत मनमोहनसिंह जसे अनिर्णयाच्या गर्तेत सापडले आहे त्याच प्रकाराची पुनरावृत्ती पक्षाच्या बाबतीत सोनिया गांधींकडून होऊ लागली आहे. पक्ष नेतृत्वाने एक तर लढाईच्या आधीच हत्यार टाकले आहे किंवा पक्ष आणि त्याचे नेतृत्व आता एवढे जख्ख म्हातारे झाले आहे की त्यांना आपले भवितव्य दिसेनासे किंवा कळेनासे झाले असावे असा निष्कर्ष त्यांनी राष्ट्रपती पदासाठी केलेल्या उमेदवार निवडीवरून काढता येतो. ज्यांच्यामुळे सरकार निष्क्रिय व निष्प्रभ झाले, सरकारला अनिर्णयाने ग्रासले आणि ज्यांना गेल्या दोन वर्षांत सरकारच्या कोणत्याच निर्णयाचे समर्थन करता आले नाही त्या मनमोहनसिंह यांना सन्मानाने राष्ट्रपती भवनात पाठवून सरकारचा चेहरामोहरा बदलून नवी प्रतिमा निर्माण करण्याची चालून आलेली संधी काँग्रेसने गमावली आहे. स्वत:वर आरोप झाले की पटकन तोंड उघडून खुलासा करण्याच्या सवयीचा अपवाद सोडला तर मनमोहनसिंहसारखा स्थितप्रज्ञ व्यक्ती शोधून सापडणार नाही. देशातील सर्व शक्तिमान असे सर्वांत महत्त्वाचे पंतप्रधान पद मनमोहनसिंह यांनी शोभेचे पद बनवून टाकले आहे. तेव्हा या पदाचे अधिक अवमूल्यन टाळणे आणि मनमोहनसिंह यांच्यासारख्या प्रामाणिक राजकीय व्यक्तीला पद देऊन पंतप्रधान व राष्ट्रपती या दोन्ही पदांची प्रतिष्ठा काँग्रेस नेतृत्वाला वाढविता आली असती. मनमोहनसिंह यांचा सर्वांत मोठा दोष म्हणजे सहकारी मंत्र्याच्या खात्यात काय चालले हे त्यांनी कधी जाणून न घेतल्याने सरकारवर काहीही पकड नसणे हा आहे. हा दोष दूर करण्यासाठी प्रणव मुखर्जी यांच्यासारखा नेता पंतप्रधानपदी बसविण्याचा उत्तम पर्याय काँग्रेसकडे होता; पण प्रणव मुखर्जी सरकारात असताना राहुल गांधींना पंतप्रधानपदी बसविण्याची काँग्रेस नेतृत्वाला लाज वाटत असावी. म्हणूनच त्यांनी प्रणव मुखर्जींना सक्रीय राजकारणातून मुक्त केले असावे. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यावर राष्ट्रपती पद दुय्यम दर्जाच्या व सुमार क्षमता आणि समज असलेल्या व्यक्तीना बहाल करण्याची परंपरा प्रणव मुखर्जी यांच्या निवडीने संपुष्टात आली ही बाब चांगली असली तरी प्रणव मुखर्जींसारखा मुरलेला मुत्सद्दी आणि राजकारणी आपली सक्रियता आवरण्यात कितपत यशस्वी होईल हे सांगणे कठीण आहे. कदाचित आपला पक्ष आगामी निवडणुकीत विजय मिळवून सत्तेवर येण्याची शक्यता धुसर वाटल्याने काँग्रेस नेतृत्वाने विरोधी पक्षाचे सरकार मुठीत ठेवण्याची क्षमता असलेले प्रणव मुखर्जी यांची निवड केली असणे तर्कसंगत आहे; पण देशातील सर्वच स्वायत्त वैधानिक संस्था आपल्या सक्रियतेने सरकारच्या डोईजड झालेल्या असताना देशाचे सर्वोच्च वैधानिक पद डोईजड होऊ शकेल अशा व्यक्तींच्या हाती देऊन काँग्रेस नेतृत्वाने विचार करण्याची क्षमता गमावली आहे असेच म्हणावे लागेल. काँग्रेस मरण पंथाला लागल्याचे हे लक्षण आहे.

### अपरिपक्व बीजेपी

एखादा पक्ष त्याच्या करणीने मरण पंथाला लागला असेल तर त्याची चिंता करण्याचे कारण नसायला पाहिजे; पण काँग्रेसचा पर्याय बनू पाहणाऱ्या प्रमुख

विरोधी पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाची परिस्थिती कॉंग्रेस पेक्षा जास्त चिंताजनक आहे. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या भाजपची विरोधी पक्ष म्हणजे सरकारच्या प्रत्येक कृतीला आणि धोरणाला विरोध करणारा पक्ष अशी बाळबोध धारणा असल्यागत या पक्षाचे वर्तन राहिले आहे. संसदेत एखाद्या प्रश्नावर धोरणात्मक चर्चा घडवून सरकारची धोरणे चुकीची असल्याचे दाखवून देण्याचे कर्तव्य या पक्षाने कधीच पार पाडले नाही. चर्चेऐवजी गोंधळ घालून संसदेचे कामकाज बंद पाडणे हीच काय ती भाजपची व्रात्य आणि उनाड पोरासारखी करतूत राहिली आहे. संसदेचे अवमूल्यन करण्यात भाजपदेखील सरकार आणि अण्णा-बाबांच्या आंदोलनापेक्षाही आघाडीवर असण्यामागे त्याचे संसदेतील बेजबाबदार वर्तन कारणीभूत आहे. पण सरकारला व संसदेला काम करू द्यायचे नाही हा विरोधी पक्ष म्हणून एक कलमी कार्यक्रम स्वीकारल्यानंतर शासनाच्या कारभाराकडे डोळसपणे पाहण्याचे कारण उरत नाही. राष्ट्रपती पदाबाबतही भाजपने विरोधासाठी विरोधाची परंपरा कायम ठेवली आहे; पण अभ्यास करून सरकारला कोंडीत पकडण्याची सवय नसलेल्या भाजपने राष्ट्रपती पदासाठीचा उमेदवार निवडताना पुरेसे होमवर्क न करून आपली फजिती करून घेतली आहे. जगभर हा रोष कोणत्या न कोणत्या निमित्ताने प्रकट होत आला आहे; पण भारतात सत्ताधारी पक्षाइतकाच विरोधी पक्षाबद्दल खदखदणारा रोष ही प्रमुख विरोधी पक्ष या नात्याने भाजपच्या कर्माची आणि कामगिरीची फळे आहेत. दुसऱ्यांनी निर्माण केलेल्या असंतोषाची फळे आपल्यालाच चाखायला मिळतील या कल्पनेनेच भाजप नेत्यांच्या तोंडाला पाणी सुटले आहे. यामुळेच बाबा आंदोलनाबाबत सरकारी हडेलहप्पीमुळे घडलेल्या दुखःद प्रकाराबद्दल राजघाटावर दुःख प्रकट करण्याऐवजी आनंदोत्सव साजरा करून आपल्या पोरकटपणाचे दर्शन भाजपने साऱ्या देशाला घडविले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांच्या पद्धतीप्रमाणे अण्णा-बाबा आंदोलनात शिरकाव करून ते आंदोलन वाढविण्यात भूमिका बजावली असली तरी भाजप नेते मात्र आयत्या बिळावर नागोबा बनून कब्जा करण्यासाठी आतूर आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे अपत्य कमालीचे आळशी असल्याची ही झलक राष्ट्रपती पदाच्या उमेदवार निवडीतही दिसून आली. भाजपसारख्या विरोधी पक्षाला राष्ट्रपती पदावर बसण्या योग्य उमेदवार समोर करता आला नाही ही या पक्षाची दयनीय स्थिती दर्शविते. माजी लोकसभा सभापती श्री. संगमा भाजपच्या मदतीला धावून आले नसते तर या पक्षाचे जगभर हसे झाले असते. कॉंग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांकडे कमालीचे कल्पना दारिद्र्य आहे हे राष्ट्रपती पदासाठी उमेदवार निवडताना दिसून आले आहे.

## जनतेचा भाबडेपणा

भाजपला विरोधी पक्षाची भूमिका पार पाडण्यात अपयश आल्याने ती भूमिका त्यांच्याकडून अण्णा आंदोलनाने हिसकावून घेतली. तसाच प्रकार व प्रयत्न राष्ट्रपती पदासाठीच्या उमेदवार निवडीबाबत घडला! या बाबतीत राजकीय पक्षांनी घातलेला घोळ लक्षात घेऊन या पदासाठी कोण उमेदवार योग्य राहील हे सांगण्याचा जनतेच्या पातळीवर प्रयत्न झाला. माध्यमांनी अनेक जनमत कौल घेतलेत. फेसबुक, ट्विटरसारखी सामाजिक माध्यमे तर उमेदवार निवडीच्या चर्चेत आघाडीवर होती. राजकारणापासून दूर राहणे पसंत करणारी व त्याचा अभिमान बाळगणारी मंडळी राजकीयदृष्ट्या जागृत होऊन राजकीय प्रक्रियेत सामील होत असतील तर देशाच्या शासन आणि प्रशासनाच्या सुधारणेकडे नेणारे आणि लोकशाही बळकट करणारे ते पाऊल ठरेल; पण या बाबतची झालेली सर्व चर्चा राजकीय अपरिपक्वतेची निदर्शक ठरली. राजकीय प्रक्रियेला पूर्णतः अराजकीय बनविण्याचा अट्टाहास चव्हाट्यावर टाकणारा आहे. राष्ट्रपती पदावर सचोटीचा माणूस बसावा हा आग्रह चुकीचा नाही. पण त्या पदावर बसण्यासाठी राजकीय दृष्टी आणि समज हीच महत्त्वाची आहे ही समज या चर्चेत कुठेच आढळून आली नाही. म्हणूनच लोक चर्चेत पूर्व राष्ट्रपती कलाम यांचे नाव सातत्याने आघाडीवर राहिले. सचोटी हा सर्वच क्षेत्रात आवश्यक असा गुण विशेष असला पाहिजे; पण ती असली म्हणजे झाले हे मानण्याची घातक प्रवृत्ती आपल्या देशात किती खोलवर रुजली आहे हे या चर्चेच्या निमित्ताने पुढे आले आहे. राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात नेतृत्वाची हीच एकमेव अट असली तर काय घडू शकते याचे पंतप्रधान मनमोहनसिंह हे उत्तम उदाहरण आहे. सचोटी व्यतिरिक्त त्या पदावर बसण्यासाठी आवश्यक गुणविशेष नसतील तर देशाचे किती नुकसान होवू शकते हे मनमोहनसिंहांनी दाखवून दिले आहे. सचोटीच्या व्यक्तींनी उचलले पाऊल चांगलेच असते आणि त्यांनी दाखविलेली दिशा चुकीची असू शकत नाही या एकमेव धारणेने अण्णा हजारेंच्या नेतृत्वाखालील आंदोलनाला बळ दिले. अशा आंदोलनाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक परिणामा विषयी बेफिकिरी येते. अण्णा हजारेंचे या वयात हे सगळे करण्या मागे काहीच स्वार्थ नाही हे पाहिले कि डोळे झाकून त्यांच्या मागे जाण्यात कोणालाच गैर वाटत नाही. अशा नेत्याला आर्थिक आणि राजकीय समज नसली तर देशाचे किती नुकसान होवू शकते हे अण्णांचा लोकपाल अस्तित्वात आला असता तर सिद्ध झाले असते. एखाद्या आंदोलनाला राजकीय - आर्थिक पाया आणि दृष्टी नसली तर त्याचे देशाच्या राजकारणावर आणि अर्थकारणावर किती भयानक परिणाम होवू शकतात याची झलक अण्णा - बाबा आंदोलनाने दाखवून दिली आहे. या आंदोलनाने शासन - प्रशासन लुळे पांगळे करून अर्थव्यवस्थेला घसरणीवर आणून ठेवण्यात महत्वाची भूमिका निभावली आहे. पण त्यांचा काय स्वार्थ, त्यांना तर फक्त देश हिताची काळजी या भावनेने होणाऱ्या अनर्थाकडे आमची डोळेझाक होते. अप्रामाणिकपणा देशासाठी जितका घातक तितकाच केवल राजकीय,सामाजिक व आर्थिक समज नसलेला स्वच्छ चारित्र्याचा नेता देशासाठी घातक ठरू शकतो हे मनमोहनसिंह आणि अण्णा हजारे या दोघानीही दाखवून दिले आहे. पण आमच्या 'स्वच्छ' चारित्र्याच्या वेडावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही हेच लोक चर्चेतून पुढे आलेल्या कलाम यांच्या नावावरून दिसून येते. कलाम हे सज्जन आहेत , स्वच्छ चारित्र्याचे आहेत , एक वैज्ञानिक म्हणून ते नावाजलेले आहेत पण राजकीय क्षेत्रातील त्यांचे योगदान काय आहे हा प्रश्न कोणालाच पडला नाही. कलामांना राष्ट्रपती पद म्हणजे सचिन तेंडुलकरने सर्वाधिक धावा काढल्या म्हणून त्याला 'भारत रत्न' पदवी देण्यासारखे आहे. इतर 'भारत रत्नां' च्या तुलनेत सचिन कुठे आहे याचा कोणी विचार करीत नाही. सचिनचा गौरव हा ' खेल रत्न ' म्हणूनच झाला पाहिजे हे विसरल्या जाते. तशीच कलामांची जागा अतिशय वरची पण वेगळी आहे याचा आम्हाला विसर पडतो. हा विसर पडण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे स्वच्छ चारित्र्याचे आणि निःस्वार्थी पणाचे आमच्या समाजाला असलेले वेड आहे. या गोष्टींचा आग्रह धरणे चुकीचे नाही पण या गुणांनी युक्त व्यक्ती कोणत्याही पदावर बसण्यासाठी पात्र असल्याची समजूत निव्वळ भाबडीच नाही तर चुकीची आणि घातकही आहे. ज्या मनमोहनसिंहाच्या नेतृत्वाने सरकारच नाही तर देशाच्या आर्थिक व राजकीय संस्था धोक्यात आल्या आहेत त्या मनमोहनसिंहाना पुढील निवडणुकी पर्यंत पंतप्रधान पदी कायम ठेवण्याचा जुगार खेळण्याची हिम्मत कॉंग्रेस नेतृत्वाने केली ती निव्वळ या देशातील लोकांना निःस्वार्थी पणाचे व स्वच्छ चारित्र्याचे वेड म्हणता येईल इतके आकर्षण असल्यामुळेच ! म्हणूनच एरवी सचोटी , निःस्वार्थीपणा आणि स्वच्छ चारित्र्य हे गुण भारतीय संदर्भात धडकी भरावी असे भितीदायक दुर्गुण बनले आहेत. राष्ट्रपती पदासाठी कोण अधिक योग्य आहे या चर्चेने आणि चर्चे मागील भावनेने केवळ आमचे राजकीय अडाणीपण समोर आणले नाहीत तर या दुर्गुणावर झगझगीत प्रकाश टाकला आहे. सामाजिक , आर्थिक आणि राजकीय समज वाढविणे हाच या दुर्गुणावर मात करण्याचा एकमेव उपाय आहे. पण सध्यातरी देशाची म्हातारी कॉंग्रेस, पोरकट भाजप आणि भाबडी जनता यांच्या कात्रीतून सुटका नाही.

**सुधाकर जाधव**

पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८

ssudhakarjadhav@gmail.com

http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# वित्तीय संस्थांना हाताशी धरून लिलाव

## शेतकरी संघटना कठोर कारवाईसाठी आक्रमक

**कवलापूर :** जिल्ह्यातील काही वित्तीय संस्का सहकारातील कायद्यांचा गैरअर्थ काढून कर्जदारांच्या घरे-जमिनींचे लिलाव काढत आहेत. याबाबत शेतकरी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. माधवनगर येथील आदिनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या जप्ती पथकाला जबर मारहाण केली. संबंधित शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून या संस्थेवर चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असून सात दिवसांत अहवाल देण्यास सांगितले आहे. दोषींवर कठोर कारवाईची शेतकरी संघटनेची मागणी आहे.

जिल्ह्यातील काही वित्तीय संस्थांनी सहकारातील कायद्यांचा गैरअर्थ काढून तसेच सहकारातील काही भ्रष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांना हाताशी धरून शेतकरी-व्यापाऱ्यांनी संस्थांना तारण दिलेल्या मिळकतीचा जाहीर लिलावाचा आभास निर्माण केला जातो आहे. महसूल कायद्याचे उल्लंघन करून कवडीमोल दराने आपल्या मर्जीतल्या भांडवलदारांना शेतकऱ्यांच्या जमिनी विकण्याचा सपाटा लावला आहे.

अशा बेकायदा कृतीबाबत गेल्या आठवड्यात माधवनगर येथील श्री आदिनाथ ग्रामीण बिगरशेती संस्थेने लिलावासाठी आलेल्या वसुली अधिकाऱ्यांस जबर मारहाण केली होती. या प्रकरणाची चौकशी शेतकरी संघटनेचे अशोक माने, ज्ञानेश्वर शिंदे, शिवाजी पाटील यांनी केली असता या संस्थेचे अनेक गंभीर स्वरूपाचे दोष आढळून आले. ही बाब जिल्हा सहकार उपनिबंधक आणि तालुका सहनिबंधकांच्या समोर पुराव्यासह मांडली. मिरज तालुका उपनिबंधक जी.एस. वर्धन यांनी संबंधित पतसंस्थेच्या चौकशीसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती दिली आहे. सात दिवसांत चौकशी करून अहवाल देण्यास अधिकारी यु. के. राजपूत यांना दिले आहेत.

ही चौकशी पारदर्शक व शेतकरी संघटनेने उपस्थित केलेल्या मुद्यास अनुसरून होते किंवा नाही यावर संघटनेचे कार्यकर्ते लक्ष देऊन असतील व संस्थेच्या सर्व संचालकांना व दोषी अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई झाल्याखेरीज शेतकरी संघटना गप्प बसणार नाही. अन्य वित्तीय संस्थांनीही शेतकऱ्यांच्या जमिनी लिलावात काढल्या असल्यास अशा सर्व कर्जदार जमीनदारांनी संघटनेशी संपर्क साधावा, असे आवाहन माने यांनी केले आहे.

### 'आदिनाथ'च्या तपासणीसाठी चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती

**कवलापूर :** माधवनगर (ता. मिरज) येथील आदिनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या कामकाजाच्या चौकशीसाठी यु. के. रजपूत यांची तपासणी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

बुधगाव (ता. मिरज) येथील कर्जदार सचिन क्षीरसागर यांच्या तक्रार अर्जावरून तालुका उपनिबंधक गौतम वर्धन यांनी ही नियुक्ती केली. शेतकरी संघटनेने थकीत कर्जाच्या वसुलीसाठी गेलेल्या आदिनाथ संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अडवून बेदम मारहाण केली होती. त्यानंतर जिल्हा सहकार उपनिबंधकांकडे तक्रारही केली होती. त्या पार्श्वभूमीवर पतसंस्था कामकाज चौकशीसाठी अधिकारी नियुक्तीला महत्त्व आहे. उपनिबंधक श्री. वर्धने यांनी आदेशात म्हटले आहे की, संस्थेकडे आर्थिक पत्रके, ठराव कायद्याप्रमाणे ठेवले आहे काय, याची तपासणी करावी, उपविधीतील नियमांच्या पालनाबाबत अहवाल द्यावा, कर्जवाटप व थकीत कर्जदारांबाबत कोणती कार्यवाही केली, याचीही चौकशी केली जाणार आहे.

(दै. सकाळमधून साभार)

### गडचिरोलीत स्वभाप आणि शेतकरी संघटना कार्यकर्त्यांची बैठक

**गडचिरोली (प्रल्हाद पाटील खुणे यांजकडून) :** नुकतीच शेतकरी संघटना, शेतकरी महिला आघाडी व स्वतंत्र भारत पक्ष कार्यकर्त्यांची बैठक दि. ६ जून रोजी वडसा येथे पार पडली. बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली. शेतकरी संघटनेचे नवे जिल्हा प्रमुख म्हणून राजेंद्रसिंह ठाकूर (मरकाम) यांची निवड करण्यात आली. शेतकरी महिला आघाडी जिल्हा प्रमुखपदी सौ. शांताबाई घिसू पाटील खुणे यांची निवड करण्यात आली, तर स्वतंत्र भारत पक्षाचे जिल्हा प्रमुख म्हणून श्री. शालीक पाटील नाकाडे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

### 'उसंतवाणी' आता पुस्तकरूपात

**औरंगाबाद :** पाक्षिक शेतकरी संघटकमध्ये इ.स. २०१० ते २०११ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या शे. भ. प. थंडा महाराज लिखित 'उसंतवाणी' या सदराचे पुस्तक होते आहे. डिंपल पब्लिकेशन, मुंबई या प्रकाशनामार्फत 'उसंतवाणी' निघत आहे. मराठवाड्यातील अलीकडच्या काळातील एका वाचकप्रिय लेखकाचे, विनोदी लिखाणातून जगण्यातील विसंगतींचा शोध घेणारे, पारंपरिक कीर्तनशैलीचा बाज राखून लिहिलेले हे पुस्तक आहे. पुस्तकाची प्रत मागविण्यासाठी शेतकरी संघटक कार्यालयात संपर्क करू शकता. मूळ किंमत १२० रू. असलेले हे पुस्तक प्रकाशनपूर्व सवलतीत १०० रुपयांत उपलब्ध होईल.

### योद्धा शेतकरी संकेतस्थळाचा उद्‌घाटन समारंभ




**वर्धा :** www.sharadjoshi.in अर्थात 'योद्धा शेतकरी' या संकेतस्थळाचा उद्‌घाटन समारंभ आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त ज्येष्ठ पत्रकार तथा नवभारत टाइम्सचे माजी संपादक मा. वेदप्रतापजी वेदीक यांच्या शुभहस्ते आणि ज्येष्ठ पत्रकार दै. लोकमत (नागपूर)चे संपादक मा. प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२ जुलै २०१२ रोजी दुपारी १ वाजता गुजराती भवन, हवालदारपुरा, वर्धा येथे होणार आहे.

सदरील वेबसाईटवर शेतकऱ्यांचे पंचप्राण मा. शरद जोशी यांचे सर्व लिखाण तथा शेतकरी संघटनेची अनुषंगिक माहिती वाचकांसाठी खुली राहील, असे संयोजक गंगाधर मुटे यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क - गंगाधर मुटे मो. ९७३०५८२००४, दत्ता राऊत मो. ८३०८८६८३७०, धोंडबा गावंडे मो. ९४२००६२८७६